रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९▌ अंक २२१ ▌ पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹



(छायाचित्र : समीर मालोदे)

# महिलांच्या समतेचा सन्मान

## कृषीवल हळदीकुंकू सोहळ्यास हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

## अलिबागमध्ये सन मराठी वाहिनीवरील कलाकारांच्या उपस्थितीत सोहळा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

चूल आणि मूल या चौकटीत अडकलेल्या महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम थोर समाजसुधारकांनी केले. हाच विचार पुढे नेत कृषीवलने आयोजित केलेला भव्य हळदीकुंकू समारंभ महिलांसाठी केवळ सौभाग्याचा नव्हे, तर समता, सन्मान आणि व्यक्त होण्याच्या हक्काचा उत्सव ठरला. 'दिवस मानाचा.. सौभाग्याचा, सन्मानाचा अन् अस्मितेचा' असा महाराष्ट्रातील नंबर १ कृषीवल हळदीकुंकू सोहळा शुक्रवारी (दि. १६) अलिबागमध्ये उत्साहात पार पडला.

चार भिंतींच्या आत दडपल्या गेलेल्या भावना, विचार आणि आनंद या समारंभाच्या निमित्ताने मोकळेपणाने व्यक्त झाला. धकाधकीच्या दैनंदिन जीवनातून थोडा निवांत श्वास घेण्यासाठी, घरकामात गुंतलेल्या महिलांना स्वतःसाठी वेळ मिळावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी, संवाद घडावा या उद्देशाने कृषीवलने ही परंपरा सातत्याने जपली आहे. हळदीकुंकू म्हणजे केवळ वाण देण्याचा कार्यक्रम नसून, महिलांमधील समानतेचा आणि सन्मानाचा संदेश देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. त्याला अलिबाग व परिसरातील हजारो महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालिका चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

(अधिकचे वृत्त व छायाचित्रे पान ३/१० वर)

### देखणे नियोजन : अशोक फडदेसाई



कृषीवल हळदीकुंकू समारंभात गेल्या तीन वर्षांपासून येण्याची संधी मिळाली आहे. अतिशय देखणे असे नियोजन या कार्यक्रमात असते. यावर्षीदेखील मला या कार्यक्रमात सेलिब्रेटी म्हणून येता आले असे सांगत 'तुझ्यासाठी तुझ्या संग' या मालिकेतील तेजा उर्फ अशोक फडदेसाई म्हणाले की, या मालिकेतील तेजा प्रेमळ व उत्साही, जीव ओतून प्रेम करणारा आहे, असे त्यांनी सांगितले.

### लकी ड्रॉ कुपनचे विजेते

कृषीवल हळदीकुंकू सोहळ्यात आयोजित लकी ड्रॉमध्ये ४४१, ४६८, ५४२, ५४६, ५५५ क्रमांकाचे कुपनधारक विजेते ठरले असून, त्यांना या सोहळ्यादरम्यान बक्षीस देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

### महिलांची उपस्थिती बघून भारावले : योगिता चव्हाण



कृषीवल हळदीकुंकू समारंभाच्या निमित्ताने अलिबागमध्ये येण्याची संधी मिळाली. अलिबाग एक पर्यटनाच्या दृष्टीने कायमच चांगले आहे. कृषीवल हळदीकुंकू समारंभात हजारो महिलांची उपस्थिती पाहून खऱ्या अर्थाने भारावून गेलो आहे. 'तू अनोळखी तरी सोबती' या मालिकेवर आणि आमच्या भूमिकेवर प्रेम करणारे प्रेक्षक म्हणून आनंद वाटला. या मालिकेबाबत सांगायचे झाल्यास सुंदर अशा प्रेमाची स्टोरी या मालिकेत आहे. दोघांचाही स्वभाव समान आहे. अर्पिता चाळीमध्ये एक लाडकी आहे. या मालिकेला चांगला प्रतिसाद मिळत आहे, असे योगिता चव्हाण उर्फ या अर्पिता म्हणाल्या.



### मालिकांवर प्रेम करणाऱ्यांना अनुभवता आले : वैभव कदम



'इन्स्पेक्टर मंजू' मालिकेतील सत्या हा समाजसेवा करणारा, विश्वास ठेवणारा आणि मेहनत घेणारा व्यक्ती आहे. आज कृषीवल हळदीकुंकू समारंभात सेलिब्रेटी म्हणून आल्यावर खूप आनंद झाला. मालिकांवर, आम्हा कलाकांवर प्रेम करणाऱ्या प्रेक्षकांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली. अतिशय चांगल्या पद्धतीने नियोजन केले आहे, असे वैभव कदम उर्फ सत्या म्हणाले.

# तीन प्रभागांत भाजपचा सुपडा साफ

## पनवेल पालिकेत महाविकास आघाडीचा जोरदार विजय

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत तीन प्रभागांत भाजप युतीचा पूर्ण पराभव झाला असून, सर्व जागा जिंकण्याचा भाजप नेत्यांचा दावा फोल ठरला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालानुसार महाविकास आघाडीचे तब्बल १८ उमेदवार विजयी झाले आहेत.



प्रभाग क्रमांक १ मधून शेतकरी कामगार पक्षाचे जनार्दन पाटील विजयी झाले आहेत. प्रभाग क्रमांक २ मधून अर्चना भोईर, योगिता फडके, अरविंद पाटील आणि राम पाटील यांनी विजय मिळवला. प्रभाग क्रमांक ३ मधून काँग्रेसच्या चिन्हावर हरेश केणी, प्रगती पाटील, तुषार पाटील आणि लीना कातकरी यांनी बाजी मारली आहे. तर, प्रभाग क्रमांक १४ मधून शेकापचे केतन भगत, मनीषा म्हात्रे, आर्या जाधव आणि लतीफ शेख विजयी झाले आहेत. महाविकास आघाडीतून एकत्रित निवडणूक लढवल्याचा मोठा फायदा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला झाला आहे. २०१७ च्या पालिका निवडणुकीत स्वतंत्रपणे लढून खाते न उघडू शकलेल्या उबाठा गटाचे यंदा पाच उमेदवार विजयी झाले आहेत. शेकाप, काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) यांच्या एकत्रित

•➤पान २ वर

### शेकापचे विजयी उमेदवार

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे (शेकाप) खालील उमेदवार विजयी झाले आहेत- प्रभाग क्रमांक १: जनार्दन पाटील, प्रभाग क्रमांक २: अर्चना भोईर, योगिता फडके, अरविंद पाटील, राम पाटील. प्रभाग क्रमांक १४: केतन भगत, मनीषा म्हात्रे, आर्या जाधव, लतीफ शेख. या विजयामुळे महाविकास आघाडीत शेकापची भूमिका अधिक मजबूत झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### पैसा हरला, कार्यकर्ता जिंकला

प्रभाग क्रमांक १४ मध्ये भाजपतर्फे १७१ कोटी रुपयांची संपत्ती असलेले उमेदवार इकबाल काझी यांना उमेदवारी देण्यात आली होती. या प्रभागात मोठ्या प्रमाणात धनशक्तीचा वापर झाला, तरीही शेकापचे उमेदवार लतीफ शेख यांनी विजय मिळवला. प्रभाग १४ मधील चारही जागांवर महाविकास आघाडीचा दणदणीत विजय झाल्याने 'पैसा हरला, सामान्य कार्यकर्ता जिंकला' अशी प्रतिक्रिया मतदारांमध्ये उमटत आहे.

# 'ईव्हीएम'चा विजय असो!

## २९ महानगरपालिका निकालांनंतर राज्यभर वाद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निकालानंतर राजकीय वातावरण तापले असून, भाजप आणि महायुतीवर ईव्हीएम (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र) वापरून निवडणूक जिंकल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षांकडून करण्यात येत आहे. संपूर्ण राज्यभरातून निकालांबाबत संशय व्यक्त केला जात असून, लोकशाही प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा दावा विरोधक करत आहेत.

विरोधी पक्षनेत्यांनी असा आरोप केला आहे की, जमिनीवरची जनमताची स्थिती आणि निकाल यामध्ये मोठी तफावत दिसून येत आहे. अनेक महानगरपालिकांमध्ये महागाई, बेरोजगारी, स्थानिक प्रश्नांवर जनतेत नाराजी असतानाही भाजप-शिंदे महायुतीला अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाल्याने ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर संशय बळावला आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि ठाकरे गटाने संयुक्तपणे प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, ही निवडणूक जनतेने नाही, तर यंत्रांनी जिंकवली आहे. ईव्हीएममध्ये पारदर्शकता नसल्यामुळेच भाजपला फायदा झाला. काही शहरांमध्ये मतमोजणीदरम्यान आक्षेप, पुनर्मोजणीची मागणी आणि मतदार यादीतील त्रुटींचे आरोपदेखील करण्यात आले आहेत. विरोधकांनी राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रारी दाखल करण्याची तयारी दर्शवली असून, ईव्हीएमच्या कार्यपद्धतीवर सखोल

•➤ पान २ वर

### मुंबईवर महायुतीची सत्ता

मुंबई : देशातील सर्वात श्रीमंत मुंबई महापालिका निवडणूक कोण जिंकणार याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे. मुंबई महानगरपालिकेत भाजप आणि ठाकरे अशी थेट लढाई झाली. निवडणुकांमध्ये सर्वाधिक चर्चेच असलेल्या देशाची अर्थिक राजधानी मुंबई कुणाची? या प्रश्नाचे उत्तर अखेर मिळाले आहे. ठाकरेंना धोबीपछाड करत मुंबईत भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने ११४ चा जादूई आकडा गाठण्यात यश मिळवले असून, भाजपचे मुंबईत तब्बल ११८ नगरसेवक विजयी झाले आहेत.

# नाईकांकडून शिंदेचा टांगा पलटी

## नवी मुंबईत भाजपाची एकहाती सत्ता

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपने निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत तब्बल ६५ जागांवर विजय मिळवला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मात्र ४१ जागांवर समाधान मानावे लागले. या निकालामुळे नवी मुंबईत गणेश नाईक यांचे राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, शहरात 'नाईकांनी शिंदेंचा टांगा पलटी घोडे फरार केले' अशी चर्चा रंगली आहे.



भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री गणेश नाईक यांनी निवडणुकीपूर्वीच पक्षश्रेष्ठींकडे शिवसेनेशी युती न करण्याचा आग्रह धरला होता. युती आणि जागावाटपावरून दोन्ही पक्षांमध्ये मतभेद झाल्याने भाजप आणि शिवसेना स्वबळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरले. जागावाटपावरून भाजप आमदार मंदा म्हात्रे आणि गणेश नाईक यांच्यात तीव्र वाद झाला होता. याच पार्श्वभूमीवर नाईक यांनी '१११ जागा जिंकून दाखवा, मी राजकारण सोडेन' असे आव्हान दिले होते. निवडणूक काळात ही लढत प्रत्यक्षात गणेश नाईक विरुद्ध एकनाथ शिंदे अशीच असल्याचे चित्र होते. दोन्ही बाजूंनी जोरदार प्रचार, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय इशारे पाहायला मिळाले. नाईक कुटुंबियांनी संपूर्ण ताकदीने प्रचारात उतरत भाजपची बाजू भक्कम केली.

माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक यांच्यासह कुटुंबियांचा सक्रिय सहभाग लक्षवेधी ठरला. संजीव नाईक यांनी विरोधकांवर खोचक टीका करत भाजपच्या विजयाचा आत्मविश्वास व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत गणेश नाईक यांना दिलेले पाठबळही भाजपसाठी निर्णायक ठरल्याचे मानले जात आहे.

अलिबागमध्ये ठिकठिकाणी पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम | शेकापच्या कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती

# क्रांतीयोद्धा नाना पाटील यांना अभिवादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी व कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी आयुष्यभर लढणारे नेते, क्रांतीयोद्धा स्व. नारायण नागू पाटील तथा नाना यांची पुण्यतिथी अलिबागमध्ये विविध ठिकाणी साजरी करण्यात आली. विविध मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



अलिबाग येथील शेतकरी भवन येथे कर्मचारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत नानांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. दरम्यान, स्व. नारायण पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन केले. यावेळी अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, नागेश कुळकर्णी व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. अलिबागमधील प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय आणि प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने वाचनालयाच्या रामनारायण सभागृहात स्व. नारायण नागू पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्ताने प्रतिमेला मंचाचे कार्यवाह तसेच ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त नागेश कुळकर्णी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नागेश कुळकर्णी यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी व कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, सर्वसामान्यांच्या आशा-आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे आणि पत्रकारितेच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे लोकशिक्षक म्हणून नाना पाटील यांचे कार्य अविस्मरणीय आहे.

या कार्यक्रमास माजी नगरसेवक आर.के. घरत, ज्येष्ठ नाट्यकर्मी तथा लेखक शरद कोरडे, पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष विकास पाटील, वाचनालयातील कर्मचारी झेबा कूरेशी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद कोरडे यांनी, तर आभार उल्हास पवार यांनी मानले.

# रानवलीत स्वच्छतेचा महायज्ञ

## ● अभियानांतर्गत ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग; विद्यार्थ्यांचे प्लास्टिक बंदीवर पथनाट्य

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी जिल्ह्यात 'विशेष स्वच्छता अभियान' राबवण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत, श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामपंचायत रानवली येथे 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना'अंतर्गत भव्य स्वच्छता मोहीम अत्यंत उत्साहात पार पडली.




यावेळी संपूर्ण गावाने एकजुटीने श्रमदान करून 'स्वच्छ रानवली, सुंदर रानवली'चा नारा दिला. शुक्रवारी ( दि.१६) जानेवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालय परिसरातून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी गावातील सार्वजनिक रस्ते, गटारे, मंदिर परिसर आणि कोपरान्-कोपरा स्वच्छ करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी संपूर्ण जिल्ह्यात स्वच्छतेचा जागर करण्याचे जे उद्दिष्ट ठेवले आहे, त्याला रानवली ग्रामपंचायतीने कृतीतून दाद दिली.

विद्यार्थ्यांच्या पथनाट्यातून प्रबोधन या मोहिमेचे मुख्य आकर्षण ठरले ते स्थानिक शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'प्लास्टिक बंदी' विषयावरील पथनाट्य. विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयाद्वारे प्लास्टिक कचऱ्याचे निसर्गावर होणारे घातक परिणाम मांडले. प्लास्टिक हटाव, पृथ्वी वाचवा आणि स्वच्छ रानवली, सुंदर रानवली अशा घोषणांनी शालेय विद्यार्थ्यांनी संपूर्ण गाव परिसर दणाणून सोडला होता.

या अभियानाचे नेतृत्व सरपंच सुरेश मांडवकर आणि उपसरपंच आत्ताउल्ला जळगावकर यांनी केले.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी अभिजित माने, रायगड जिल्हा परिषद रानवली मराठी शाळेचे मुख्याध्यापक भिकू पांगारकर यांच्यासह समाजसेवक राजू जाधव, विठोबा हावरे, भीमराव जोशी, भाविका जोशी, आयुब खान, ताजउद्दीन खान, रुकमुद्दीन सोगे या मान्यवरांनी हातात झाडू घेऊन श्रमदान केले. अंगणवाडी सेविका, मदतनीस, तरुण मंडळाचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थांच्या मोठ्या उपस्थितीमुळे या मोहिमेला एका लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले होते. ग्रामपंचायतीच्या या स्तुत्य उपक्रमाचे आणि विद्यार्थ्यांच्या जनजागृतीचे संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यातून कौतुक होत आहे.

> प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली आम्ही रानवली गावाला केवळ स्वच्छच नाही तर पूर्णपणे 'प्लास्टिकमुक्त' करण्यासाठी कटिबद्ध आहोत. आजच्या या मोहिमेमुळे ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत नवीन चैतन्य निर्माण झाले असून हे अभियान आम्ही सातत्याने राबवू.
> –सुरेश मांडवकर, सरपंच

## महेश शेलार यांचे निधन

**माणगाव :** तालुक्यातील खर्डी खुर्द गावचे महेश केशव शेलार यांचे शुक्रवारी (दि.१६) जानेवारी रोजी त्यांच्या राहते घरी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय-४२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, वाहिनी, दोन बहीणी, पुतणे असा परिवार आहे. त्यांनी तालुक्यात दहा वर्षाहून अधिक काळ पत्रकारिता करून तालुक्यातील विविध प्रश्न, समस्यांवर आवाज उठवला होता. त्यांच्या पार्थिवावर खर्डी खुर्द येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी रविवार (दि.२५) जानेवारी रोजी तर उत्तरकार्य मंगळवार (दि.२७) जानेवारी रोजी होणार असल्याचे त्यांचे बंधू मंगेश शेलार यांनी सांगितले.



पान १ वरून

## तीन प्रभागांत भाजपचा सुपडा साफ

ताकदीमुळे पनवेलच्या राजकारणात भाजपच्या एकहाती सत्तेला मोठा धक्का बसला आहे. विशेषतः प्रभाग २, ३ आणि १४ मधील निकाल महाविकास आघाडीसाठी उत्साहवर्धक ठरले आहेत.

निवडणुकीच्या तोंडावर शेकापमधील अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने भाजप नेत्यांमध्ये अतिआत्मविश्वास निर्माण झाला होता. मात्र, हाच आत्मविश्वास भाजपाला नडल्याची प्रतिक्रिया महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून व्यक्त होत आहे

.खारघरमध्ये भाजपच्या दोन जागा घटल्या

मागील निवडणुकीत खारघर वसाहतीतील संबंधित प्रभागांमध्ये भाजपाने सर्वच्या सर्व १२ जागा जिंकल्या होत्या. मात्र, यंदा महाविकास आघाडीच्या दोन उमेदवारांनी विजय मिळवत भाजपच्या दोन जागा कमी केल्या आहेत. खारघरमधील हा बदल भाजपसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

## 'ईव्हीएम'चा विजय असो!

चौकशीची मागणी केली आहे.

दरम्यान, भाजप-शिंदे महायुतीने हे सर्व आरोप फेटाळून लावत निकाल जनतेच्या विश्वासाचा कौल असल्याचा दावा केला आहे. ईव्हीएमबाबतचे आरोप हे पराभव झाकण्यासाठी केले जाणारे राजकारण आहे. निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह लावणे म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे. राज्य निवडणूक आयोगानेही याआधी अनेक वेळा ईव्हीएम पूर्णपणे सुरक्षित आणि विश्वासार्ह असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, तरीही विरोधकांकडून सातत्याने शंका उपस्थित केल्या जात असल्याने येत्या काळात हा वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असले, तरी ईव्हीएमविरोधातील राजकीय संघर्ष आता राज्यव्यापी आंदोलनाचे रूप घेण्याची चिन्हे दिसत आहेत. राज्यभरात या निकालावरुन नाराजीचा सूर आळवला जात असून, सर्वसामान्य नागरिकांकडूनही संताप व्यक्त होत आहे.

# नवी मुंबई विमानतळावरुन एक लाख जणांचा प्रवास

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने व्यावसायिक सेवा सुरू झाल्यानंतर केवळ १९ दिवसांत एक लाख प्रवाशांचा टप्पा पार केला. आता हवाई प्रवासाची मागणी वाढत आहे. या विमानतळावरून १२ जानेवारीपर्यंत १,०९,९१७ जणांनी प्रवास केला. यामध्ये ५५,९३४ आगमन प्रवासी आणि ५३,९८३ प्रस्थान प्रवाशांचा समावेश आहे. १० जानेवारी रोजी सर्वाधिक ७,३४५ जणांनी येथून प्रवास केला. विमानतळावरून ७३४ एअर ट्रॅफिक मुव्हमेंट हाताळण्यात आल्या. त्यामध्ये ३२ जनरल एव्हिएशन फ्लाइट्सचा समावेश आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी बॅगेज हाताळणी यंत्रणा अधिक प्रभावी ठरली आहे. या काळात ४०,२६० आगमन बॅगा आणि ३८,७७४ प्रस्थान बॅगा यशस्वीरीत्या हाताळण्यात आल्या आहेत, अशी माहिती देण्यात आली. नवी मुंबई विमानतळाच्या कार्गो विभागातही सकारात्मक सुरुवात झाली आहे. त्यानुसार आतापर्यंत २२.२१ टन मालवाहतूक करण्यात आली. कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने दिल्ली, गोवा आणि बंगळुरू ही प्रमुख ठिकाणे आहेत. आधुनिक पायाभूत सुविधा, सुलभ प्रक्रिया आणि ऑपरेशनल कार्यक्षमतेवर भर देत टप्प्याटप्प्याने सेवा विस्तार केला जात असल्याचे विमानतळ प्रशासनाने म्हटले आहे.

मुंबईहून चंडीगडसाठी उड्डाण केलेल्या इंडिगो कंपनीच्या विमानाला चंदिगड विमानतळावर दाट धुके असल्यामुळे पुन्हा मुंबईत उतरवण्यात आले. त्यामुळे या विमानातील १८० प्रवासी पाच तास विमानातच होते.

सकाळी ८ वाजून २० मिनिटांनी २ या विमानाने चंडीगडसाठी उड्डाण केले. हे विमान सकाळी १० वाजून २५ मिनिटांनी चंडीगडच्या शहिद भगतसिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणे अपेक्षित होते. त्या विमानतळावर दाट धुके असल्यामुळे दृष्यमानता शून्य होती. परिणामी वैमानिकाला विमान उतरवणे शक्य झाले नाही. त्यामुळे वैमानिकाने हे विमान पुन्हा मुंबईच्या दिशेने वळवले आणि दुपारी २ वाजून १९ मिनिटांनी हे हे विमान मुंबईत उतरले.

## एसटीआगारात इंधन बचत मास प्रारंभ

**। श्रीवर्धन शहर । प्रतिनिधी ।**

दरवर्षीप्रमाणे १६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीकरिता एसटी महामंडळाच्या इंधन बचत कार्यक्रमाचा प्रारंभ श्रीवर्धन आगारात करण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता आनंद जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी जोशी यांनी पर्यावरणासंबंधीचे अनेक फायदे सांगितले. विभागीय यंत्र अभियंता चव्हाण, आगार व्यवस्थाप कमेहबूब मणेर यांनी इंधन बचती संबंधी मार्गदर्शन केले. इंधन विभागात कार्यरत असलेले कर्मचारी, आगारातील चालक-वाहक कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी इंधन बचतीमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या पाच चालकांचे यावेळी अभिनंदन करण्यात आले. आगाराचे वाहतूक निरीक्षक धनाजी म्हसकर, कार्यशाळेतील कारागीर मंगेश चांदोरकर, सहाय्यक प्रमोद लाड यांनीही इंधन बचती संदर्भात मार्गदर्शन केले.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक कौसर मसूद खतीब आणि मेजबिन शौकत गोरमे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याकरीता खाली नमूद मिळकतीवरील मालकी हक्कांची तपासणी करणेची आहे. मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १० | ००-६८-०० | १७.४४ |

वर नमुद क्षेत्रापैकी ०-१५-०१ हे.आर.चौ.मी. एवढे क्षेत्र, आकार रु. ३.९१ पै.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणा व्यक्ती, आर्थिक संस्था, बँका, भागीदारी संस्था, कंपनी इत्यादी यांचा गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, कुळ हक्क, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा न्यायालयीन वाद, एफ. एस. आय. टी. डी. आर. वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती वरील विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध आहेत असे समजून तसा दाखला देण्यात येईल आणि माझे अशिल वर नमूद मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १६/०१/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

# शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन

**। उरण । प्रतिनिधी ।**

जासई-दास्तान फाटा येथे १९८४ साली शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी झालेल्या व देशभरात गाजलेल्या आंदोलनात पाच शेतकऱ्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. मात्र त्यानंतर ४० वर्षांचा काळावधी लोटल्यानंतरही शेतकरी, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न जैसे थे आहेत. त्यामुळे शेतकरी, प्रकल्पग्रस्त, भुमीपुत्रांचे पुनर्वसन, रोजगाराचे प्रश्न मार्गी लावणे तसेच नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव लावणे हीच आंदोलनातील हुतात्मे आणि दिवंगत दि.बा. यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे असे प्रतिपादन हुतात्म्यांच्या विचारांनी प्रेरित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांनी व्यक्त करत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.

नवीमुंबई वसविण्यासाठी सिडकोने कवडीमोल भावाने जमिनी संपादित करण्यासाठी सुरुवात केली होती. संपादन जमिनीला विरोध करताना शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य मोबदला मिळावा यासाठी जानेवारी १९८४ साली शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. दिबांच्या मार्गदर्शनाखाली दास्तान व नवघर येथे हजारोंच्या संख्येने जमलेल्या शेतकरी आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. या गोळीबारात नामदेव शंकर घरत (चिर्ले), रघुनाथ अर्जुन ठाकूर (धुतुम), कमलाकर कृष्णा तांडेल तसेच महादेव हिरा पाटील व केशव महादेव पाटील (पागोटे) यांनी बलिदान दिले. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी हौतात्म्य पत्करलेल्या पाचही हुतात्म्यांचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी १६ जानेवारी रोजी जासईत तर १७ जानेवारी रोजी पागोटे येथे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

आदरांजली वाहण्यासाठी जासई येथील हुतात्मा स्मारकात अभिवादन सोहळा पार पडला. या सोहळ्या प्रसंगी नगराध्यक्षा भावना घाणेकर, कामगार महेंद्र घरत, भूषण पाटील, दिनेश पाटील, रवींद्र पाटील, अतुल पाटील, अविनाश कोळी, संतोष घरत, नरेश घरत, जितेंद्र म्हात्रे, सुचिता ठाकूर, चंद्रकांत घरत, सीमा घरत, बळी घरत, गोपिचंद्र पाटील आदी मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते.

## पनवेल-कळंबोली दरम्यान ब्लॉक

**पनवेल :** डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या पनवेल ते कळंबोलीदरम्यान ओपन वेब गर्डरची उभारणी करण्यात येणार आहे. यासाठी मध्य रेल्वेने १८ जानेवारी ते १५ फेब्रुवारीदरम्यान प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी रात्री २ ते ५ तासांचा ब्लॉक घोषित केला आहे. पनवेल ते कळंबोली दरम्यान अप आणि डाऊन मार्गावर असणार आहे. त्यामुळे १४ मेल/एक्सप्रेस वेळापत्रकांवर परिणाम होईल. डीएफसीसी प्रकल्पातील ओपन चैब गर्डर ११० मीटर लांबीचा आहे. त्याचे वजन १५०० मेट्रिक टन असणार आहे. मध्यरात्रीच्या ब्लॉकमध्ये गर्डर उभारणी पूर्ण करण्यात येणार आहे. १६ मेल-एक्स्प्रेसवर परिणाम होणार असून काही मेल-एक्सप्रेस विलंबाने धावणार आहेत.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मुळगाव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक मनमीत कौर मोखा यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २५ | ५ | ०-८४-०० पैकी लिहुन देणार यांचे मालकीचे ०-२६-०० इतके विकत दिलेले क्षेत्र | ०-५५ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१७/०१/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

दि.    /  / २०२६

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : पोट तुकडी, ता. कर्जत, जि. रायगड तसेच रायगड जिल्हा परिषद व तालुका पंचायत समिती कर्जत यांचे हद्दीतील गाव मौजे खरवंडी येथील पुढील जमिन मिळकती अ) गट नं. १६/२ यांसी क्षेत्र ० हे ७.६० आर पोट खराबा क्षेत्र ० हे १ आर असे दोन्ही मिळुण एकुण क्षेत्र ० हे ८.६० आर यांसी आकार ० रु ५९ पैसे ही जमिन मिळकत यांसी चतुः सिमा पुढीलप्रमाणे:- पुर्वेस गट नं. १/१अ पश्चिमेसः गट नं. १५/१क, दक्षिणेसः खरवंडी गावठाण, उत्तरेसः गट नं. १६/१ व १५/१ क ही मिळकत तिचे विद्यमान मालक श्रीमती इंदिरा नामदेव काळभोर, श्रीमती ज्योती अविनाश मांडावले आणि श्री. संदेश नामदेव काळभोर रा. कर्जत मालकी वहीवाटीची आहे. आणि ब) कायमस्वरूपी वहिवाटीच्या रस्त्याकरीता खरेदी घेत असलेले क्षेत्र गट नं. २/१ यांसी क्षेत्र ० हे २४.०० आर पो. खराबा क्षेत्र ० हे ४.१० असे दोन्ही मिळुण एकुण क्षेत्र २८.१० आर यांसी आकार १ रु ४१ पैसे या जमिन मिळकतीपैकी क्षेत्र रुंदी ९ मिटर लांबी ५५ मिटर यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस गट नं. २/१ पश्चिमेस : खरवंडी गावात जाणारा मुख्य रस्ता, दक्षिणेस : गट नं. २/१ उत्तरेस : गट नं. १५ ही मिळकत सदर मिळकत तिचे विद्यमान मालक श्रीमती इंदिरा नामदेव काळभोर, श्रीमती ज्योती अविनाश मांडावले आणि श्री. संदेश नामदेव काळभोर रा. कर्जत यांचे मालकी वहीवाटीची आहे. क) कायमस्वरूपी वहिवाटीच्या रस्त्याकरीता खरेदी घेत असलेले क्षेत्र गट नं. १५/१क यांसी क्षेत्र ० हे २७.१० आर पो. खराबा क्षेत्र ० हे ६.६० असे दोन्ही मिळुण एकुण क्षेत्र ० हे ३३.७० आर यांसी आकार १ रु १२ पैसे या जमिन मिळकतीपैकी क्षेत्र रुंदी ९ मिटर लांबी ५५ मिटर यांसी चतुः सिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस : गट नं. १६/२, पश्चिमेस गट नं १५, दक्षिणेस : गट नं. १५/१/क, उत्तरेस गट नं. १५/१क सदर मिळकत तिचे विद्यमान मालक श्री तुकाराम लाडू पवार यांची मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीची आहे. वर नमुद सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस खरेदी देण्याविषयी बोलणी चालु आहेत.

नोटीस प्रसिद्ध करण्यास संमती दिलेली आहे. सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस दिला आहे. सदर मिळकतींबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, खरेदी, साठेखत, पोटगी, लीन, लीज, कुळ, खंडचिठ्ठी, चोळीबांगडी, करार-मदार, वहिवाट, भाडेकरार, वारसा हक्क, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, अधिकार, बोजा, दावा असल्यास तसेच सदर व्यवहारास कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष भेट घेऊन मुळ कागदपत्रांनिशी खात्री करून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कोणतीही हरकत अथवा तक्रार चालणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**महेश के शहाडे**
ॲडव्होकेट
मो.नं. ९९६०२६२३६०/९०११४८१४६५

**जाहीर नोटीस**

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. दिपक किसन जगे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे अंजप, ता. कर्जत, जि. रायगड | २४/११ | ०.१६.०० | ०.१५ |
| | २४/१२ | ०.४१.०० | ०.३५ |
| | २४/१५ | ०.१६.०० | ०.३० |
| | २४/४/अ | ०.०६.०० | ०.०५ |
| | २४/५ | ०.३०.०० | ०.३५ |
| | २४/७ | ०.१३.०० | ०.१५ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १७/०१/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

## डायलिसिसच्या रुग्णांसाठी सहल

**पनवेल :** पनवेल शहरातील बिरमोळे हॉस्पिटलतर्फे डायलिसिसच्या रुग्णांसाठी वार्षिक सहल वरसोली-अलिबाग येथे नुकतीच आयोजित करण्यात आली. सहलीमध्ये डायलिसिसचे रुग्ण, त्यांचे काळजीवाहू नातेवाईक व डायलिसिस विभागाचे कर्मचारी यांनी भाग घेतला. या सहलीमुळे रुग्णांमध्ये सकारात्मकता वाढवून नवी उमेद आल्याचे जाणवले. या सहलीच्या आयोजनासाठी डॉ. बी. जे. बिरमोळे, डॉ. नीलम नलावडे यांचे मार्गदर्शन लाभले. सहल यशस्वी करण्यासाठी रश्मी पोतनीस व डायलिसिसचे सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वाजेकर महाविद्यालयात कर्करोग जनजागृती

**। उरण । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे, लायन्स क्लब ऑफ उलवे जेम्स लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पस आणि दिपिशा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.१६) रोजी आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने कर्करोग जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.




याप्रसंगी महाविद्यालयचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी कार्यक्रमाचा महत्व सांगितले. सदर कार्यक्रमात दीपिशा फाऊंडेशनचे डॉ. दिपाली गोडघाटे यांनी कर्करोगाचे प्रकार, कारणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच वेळेवर तपासणीचे बाबत मार्गदर्शन केले. उपक्रमासाठी प्राचार्य बबन साळुंखे, बाबुलाल पाटोळे, झुंजार माने, ऋषिकेश धुरी, अरुण देवरे, रेवेक्षिका थोरात, डॉ. मिलिंद पाटील, कोळी, रमाकांत म्हात्रे, संदीप पाटील व सहकारी उपस्थित राहून सहकार्य केले. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाचा लाभ ३५० पेक्षा अधिक लाभार्थ्यांनी घेतला. प्रा. संतोष देसाई, डॉ. सुजाता पाटील, प्रा. योगेश कुलकर्णी, व इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कार्मच्याऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत विद्यमान मालक महेश नरहरी कुंभार, संदेश नरहरी कुंभार, आशा वसंत बिरवाडकर, पौर्णिमा संजय मांडेलकर, ज्योती नरहरी कुंभार, नेहा देवेंद्र नागोठणेकर, गणेश नरेश पालवणकर यांचेकडुन विकसनाला घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत त्यांचे निर्वेध मालकीची आणि ताबा वहिवाटीची असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | उपविभाग क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १२१ | ए/१/१ (पुर्वीचा १/ब) | ००-१९-८२ | ३.४० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा विकसन करारनामा पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १६/०१/२०२६

**ॲड. रविंद्र वि. ओक**
'गुरूकृपा'
अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता.
अलिबाग, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. चंद्रकांत किसन जगे व राजाराम किसन जगे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे अंजप, ता. कर्जत, जि. रायगड | २४/१ | २.१९.०० | २.२० |
| | २५/३ | १.२७.५० यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०.८८.९० | २.२२ |
| | २७/२ | ०.१२.१० | ०.१० |
| | २३/१/अ | ०.१५.०० | ०.१५ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांकः १७/०१/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

# पनवेलमधील घरफोडीचा गुन्हा उघड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत टपालनाका परिसरात झालेल्या मोठ्या घरफोडीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी कुर्ला, मुंबई येथून एका सराईत गुन्हेगाराला अटक केली असून त्याच्याकडून चोरीला गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी सात लाख २२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



फिर्यादी प्रमोद जोरी (रा. सचिन प्लाझा बिल्डिंग, पांजरपोळ, टपालनाका, पनवेल) यांच्या बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला होता. चोरट्यांनी घरातील ८,१२,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि ९०,००० रुपये रोख रक्कम, असा एकूण ९,०२,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासासाठी पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे, अविनाश गंथडे, योगेश दिवेकर, परेश म्हात्रे, सम्राट डाकी, विनोद देशमुख, किरण कराड आदींच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, कमरुद्दिन सलाउद्दीन शेख (वय ४५ वर्षे, रा. टॅक्सीमन कॉलनी, कुर्ला, मुंबई) याला ताब्यात घेतले असता तपास दरम्यान आरोपीकडून चोरीला गेलेल्या मालापैकी सात लाख बावीस हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक विद्या वामन बाडकर यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| ३२/४ | ०.२८.०० पो.ख. ०.०२.०० एकूण ०.३०.०० | ०.२७ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १६/०१/२०२६

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत-रायगड.



# हळदी कुंकू

पान १ वरुन : पीएनपी नाट्यगृहाच्या परिसरात शुक्रवारी (दि.१६) दुपारी ३ वाजल्यापासून महिलांची गर्दी वाढू लागली आणि सायंकाळपर्यंत महिलांच्या उपस्थितीने परिसर फुलून गेला. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी हळदीकुंकू लावत एकमेकांचे औक्षण केले. सौभाग्याचे आणि मानाचे वाण देण्यात आले. संपूर्ण वातावरण उत्साह, आनंद आणि महिलांच्या एकजुटीचे दर्शन घडवणारे होते. या समारंभाला सन मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिकांमधील कलाकारांनी हजेरी लावली. प्रेक्षकांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाल्याने कलाकारांनीही समाधान व्यक्त केले. लेझीम पथकाच्या पारंपरिक नृत्याने कलाकारांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. हा समारंभ खेळ, लकी ड्रॉ, विविध खरेदी स्टॉल्स आणि मनोरंजनामुळे महिलांसाठी एक पर्वणी ठरला.



## हजारो महिलांची उपस्थिती

कृषीवल हळदीकुंकू समारंभाची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. अखेर ही उत्कंठा शुक्रवारी सायंकाळी ४ वाजल्यानंतर संपली. दुपारी ३ वाजल्यापासून महिला येण्यास सुरुवात झाली. बोलता बोलता महिलांची अलोट गर्दी झाली. पारंपारिक पेहराव करीत महिला या हळदीकुंकू समारंभामध्ये सहभागी झाल्या. एकमेकांना हळदीकुंकू लावून औक्षण करण्यात आले. त्यानंतर सौभाग्याचे व मानाचे वाण देण्यात आले. या निमित्ताने एक वेगळा उत्साह पहावयास मिळाली.

## खेळातून लुटला आनंद

कृषीवल हळदीकुंकू समारंभानिमित्त सौभाग्याचे वाण देण्याचा कार्यक्रम साजरा होत असताना खास महिलांसाठी वेगवेगळया प्रकारचे खेळ आयोजित केले होते. एक ते नऊ आकडे इंग्रजी व मराठीत बोलणे, उखाणे तसेच सध्या सोशल मीडियावरील रिल्समधील गाणी इत्यादी खेळ घेण्यात आले. या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने महिला व तरुणींनी सहभाग घेतला. त्यामध्ये पेझारी येथील मिलीना पाटील, बेलकडे येथील उर्मिला नाईक यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून खेळातून महिलांनी आनंद लुटला.

## वेगवेगळ्या स्टॉल्समध्ये खरेदीची लूट

कृषीवल हळदीकुंकू समारंभानिमित्त खास वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल्स उभारण्यात आले. त्यामध्ये ज्यांना चारचाकी गाडी घेण्याची आवड आहे, त्यांच्यासाठी वासन टोयेटो या कंपनीच्या कारचे स्टॉल होते. तर, ज्यांना दुचाकी घेण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी सुझूकी कंपनीची दुचाकीचे स्टॉल होते. तसेच, वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेणाऱ्यांसाठी सुहाना मसाले आणि राम बंधू मसाले यांचे स्टॉल होते. त्याचबरोबर, खोजाती फार्मचे देखील स्टॉल होते. या विविध स्टॉलमध्ये खरेदी करण्यासह दुचाकी व कारची बुकींग करण्यासाठीदेखील महिलांची गर्दी दिसून आली. दरम्यान, कृषीवलच्यावतीने लकी ड्रॉदेखील ठेवण्यात आले. या वीस रुपयांच्या कुपनवर आकर्षक बक्षीस ठेवण्यात आले होते. त्यासाठीदेखील महिलांनी गर्दी केली होती.

यावेळी कृषीवलच्या माजी व्यवस्थापकीय संचालिका सुप्रिया पाटील, अलिबागच्या माजी नगराध्यक्षा सुनिता नाईक, नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयाच्या कार्याध्यक्षा शैला पाटील, साधना पाटील, ॲड. निता पाटील, ॲड. निलम हजारे, शैला भगत, नागेश्वरी हेमाडे, अंजली मोरे, अनिता पवार, संगीता म्हात्रे, वैष्णवी शेट्ये, सुकन्या साखरकर, पीएनपी एज्युकेशन सोसायटी, कृषीवलमधील महिला कर्मचारी तसेच अलिबाग व परिसरातील हजारो महिला उपस्थित होते. महिलांच्या हक्काचे व सौभाग्याचे प्रतीक समजल्या जाणाऱ्या हळदीकुंकू समारंभ महिलांसाठी एक पर्वणीच ठरली आहे.

## सेलिब्रेटींचे जल्लोषात स्वागत

अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहाच्या परिसरात कृषीवलच्या व्यवस्थापकीय संचालिका चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा झाला. सन मराठी वाहिनीतील हुकुमाची राणी ही, या मालिकेतील वैभवी चव्हाण (राणी) अक्षय पाटील (इंद्र), इन्स्पेक्टर मंजू मालिकेतील मोनिका राठी (मंजू), वैभव कदम (सत्या), तू अनोळखी तरी सोबती या मालिकेतील योगिता चव्हाण (अर्पिता), अंबर गणपुले (समीर) हे कलाकार उपस्थित होते. यावेळी मान्यवरांसह सेलिब्रिटींचे टाळ्याचा कडकडाट जल्लोषात स्वागत करण्यात आले. दरम्यान, पीएनपी नाट्यगृहाच्या प्रवेशद्वारासमोर सेलिब्रेटींचे आगमन होताच, पीएनपी होली चाईल्डमधील लेझीम पथकाने पारंपरिक पद्धतीने लेझीम वाद्यातून नृत्याचे सादरीकरण करीत त्यांचे स्वागत केले.









● कृषीवलच्यावतीने लकी ड्रॉदेखील ठेवण्यात आले होते. लकी ड्रॉ विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

## कृषीवलचा स्तुत्य उपक्रम : वैभवी चव्हाण



कृषीवल आयोजित हळदीकुंकू समारंभाला येण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून थेट प्रेक्षकांना भेटता आले. त्यांच्याशी संवाद साधता आला. एक चांगला उपक्रम कृषीवलने राबविला आहे, असे सांगत वैभवी चव्हाण यांनी सन मराठी वाहिनीतील 'हुकुमाची राणी ही' या मालिकेतील त्यांची राणी म्हणून असलेल्या भूमिकेबाबत माहिती दिली. या मालिकेतील राणी ही जिद्दी आणि कष्टाळू आहे. दुसऱ्यांचे हित जपणारी आणि प्रेम करणारे एक व्यक्तीरेखा आहे. अन्यायाविरोधात लढणारी आहे. या मालिकेने संयम ठेवायला शिकवले आहे, असे त्या म्हणाल्या.

## प्रेक्षकांशी संवाद साधता आलाः अक्षय पाटील



कृषीवलच्या हळदीकुंकू समारंभाच्या निमित्ताने अलिबागमध्ये येण्याची संधी मिळाली. योग्य असे व्यवस्थापन पाहावयास मिळाले. चित्रलेखा पाटील यांच्या माध्यमातून राबविलेल्या या उपक्रमाचे खऱ्या अर्थाने कौतुक आहे. मालिकांमध्ये काम करीत असताना भूमिकेबाबत प्रत्यक्षपणे प्रेक्षकांचे काय मत असते, हे कळत नाही. परंतु, आज कृषीवल हळदीकुंकू समारंभानिमित्ताने मालिकेविषयी असलेले प्रेम दिसून आले. या मालिकेत इंद्रा हा शिस्तप्रिय व हळव्या मनाचा आहे. टॅलेंट असले तरी कष्ट असणे गरजेचे आहे. या विचाराचा तो आहे. प्रत्यक्ष जीवनातही हाच विचार घेऊन काम करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे अक्षय पाटील म्हणाले.

## जिद्द आणि चिकाटी असल्यास ध्येय गाठू शकतो : मोनिका राठी



कृषीवल हळदीकुंकू समारंभात सेलिब्रिटी म्हणून आल्याचे खूप छान वाटले. आयोजकांनी चांगल्या पद्धतीने नियोजन केले आहे. मालिकांमध्ये काम करीत असताना प्रेक्षकांचे कलाकारांवर असलेले अप्रत्यक्ष प्रेम कळत नाही. परंतु, कृषीवल हळदीकुंकू समारंभाच्या माध्यमातून आज प्रत्यक्ष प्रेक्षकांचे प्रेम पाहावयास मिळाले. त्यामुळेच काम करण्याची ऊर्जा मिळते. हीच ऊर्जा घेऊन अधिक चांगले काम करणार असे 'इन्स्पेक्टर मंजू' या मालिकेतील मंजू उर्फ मोनिका राठी म्हणाल्या. पुढे त्यांनी सांगितले की, आयुष्याच्या वाटेवर अनेक परीक्षा होतात. मार्ग कधीही सोपा नाही. जिद्द आणि चिकाटी असल्यास ध्येयापर्यंत पोहोचता येते. तेच ध्येय ठेवा, यश नक्की मिळेल, असे आवाहन मोनिका राठी यांनी केले.

## कृषीवलमुळे कार्यक्रमाची संधी मिळाली : अंबर गणपुले



'तू अनोळखी तरी सोबती' या मालिकेला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या मालिकेत समीर नावाची व्यक्तीरेखा साकारली आहे. या मालिकेला भरभरून प्रेम मिळत आहे, असे बोलत असताना अंबर गणपुले उर्फ समीर म्हणाले की, कृषीवलच्या हळदीकुंकू समारंभात आज आल्याचा आनंद वाटलो. महिलांची ही गर्दी बघून खूपच समाधान वाटले. आमच्यासोबत फोटो काढण्याबरोबरच सेल्फी काढण्याचा आनंद अनेकांनी घेतला हे बघून खूपच बरे वाटले, असे अंबर गणपुले उर्फ समीर म्हणाले.

## खूप आनंद वाटला : अनुष्का गीते



'तुझ्यासाठी तुझ्या संग' या मालिकेतील वैदेही म्हणाल्या की, ही मालिका गेल्या सहा महिन्यांपासून सुरु आहे. प्रेक्षकांकडून भरभरून प्रेम मिळत आहे. हळदी कुंकू समारंभामध्ये आल्यावर खूप आनंद वाटला, असे अनुष्का गीते उर्फ वैदेही म्हणाल्या.











**Hiring Walk In Interview**

Company name:- InvoSolar Energy Pvt Ltd
Designation:- Sales Executive
Product:- Solar Panel
Location:- Alibag
Gender:- Male / Female
Equipment needed:- Two Wheeler and Mobile
Qualification:- 12th pass
Petrol allowance:- 5k
Fixed Salary:- 15k
Experience:- 1 year in corporate Sales.

Contact : Mejanoor Shaikh - 8268696332
Nikhil chavan - 9881401550

Send your CV
at:-shaikhmejanoor007@gmail.com

ADDRESS:-SUKHSAGAR BHAVAN, 2ND FLOOR, OPPOSITE AMBEDKAR STATUE, ALIBAG, RAIGAD - 402201

# क्षमस्व, अभिनंदन नाही!

भारतीय जनता पक्षाची मोहीम अखेर फत्ते झाली आहे. मुंबई पालिका ताब्यात घेण्यासाठीच गेल्या पाच वर्षांपासून सतत अट्टाहास चालू होता. तो आता सफल होणार आहे. मात्र याबद्दल भाजपचे अभिनंदन करता येऊ शकणार नाही. कारण भाजपने खूप आधीपासून रणनीती वगैरे आखली असली तरी त्याने याकरिता जे मार्ग वापरले ते अतिशय हीन दर्जाचे होते. थोडक्यात, समोरासमोर लढून, नीतीमत्तेने व स्वतःच्या ताकदीवर भाजपला हा विजय मिळालेला नाही. हा मजकूर लिहित असताना अंतिम आकडेवारी आलेली नाही. पण मुंबईमध्ये भाजप सेना युतीची सत्ता येणार आणि त्यात सिंहाचा वाटा भाजपचा असणार हे नक्की झाले आहे. आता मुंबईचा पुढचा महापौर भाजपचाच होईल हेही स्पष्ट आहे. वास्तविक विधानसभेला ज्या पक्षाने इतके राक्षसी बहुमत मिळवले व स्वबळावर सत्तेत येता येईल अशी संख्या जवळपास गाठली त्याच्यासाठी मुंबईसारख्या एका शहरात यश मिळवणे फार अवघड नसायला हवे होते. पण मुंबईची आजवरची घडण, तिने बराच काळ ठाकरे शिवसेनेला दिलेली साथ आणि इथला मराठी माणूस आपल्यासोबत येईल की नाही याबाबत वाटत असलेली साशंकता यामुळे भाजपला मुंबई जिंकणे सोपे नव्हते. आर्थिक राजधानी म्हणून तिच्यावर कबजा करणे तर भाजपसाठी अत्यंत महत्वाचे होते. त्यामुळे अंतिम टप्प्यात काय वाट्टेल ते प्रकार केले. पैशांचा पाऊस तर पाडलाच. पण ठाकरे सेनेचा जो जो म्हणून निवडून येण्याची शक्यता आहे त्याला आपल्याकडे खेचले. याचे उत्कृष्ट उदाहरण मुंबईतील दहिसरचे आहे. दहिसरची आमदारकी गेले दोन वेळ भाजपकडे आहे. येथे वॉर्ड क्रमांक दोनमध्ये गेल्या वेळी भाजपचेच नगरसेवक होते. तरीही येथे शिवसेनेचे नेते विनोद घोसाळकर यांच्या सूनबाई तेजस्वी घोसाळकर यांना भाजपमध्ये घेऊन उमेदवारी देण्यात आली. या घोसाळकरबाई स्वतःच्या मनाविरुध्द पण भाजपच्या दबावातून भाजपमध्ये आल्या. त्यांनी पत्रकार परिषदेत जवळपास तसे बोलूनही दाखवले. आता त्या विजयी झाल्या आहेत. अशाच रीतीने मुंबई तसेच इतरही शहरांमध्ये फोडाफोडी करून भाजपने आपले घर सजवले आहे.

### नित्तीमत्तेचे तीन तेरा

काही उमेदवारांना तर चक्क इतर पक्षातून उमेदवारी दाखल केल्यानंतरही पळवण्यात आले. नीतीमत्तेच्या कुठल्याच तत्वात बसेल हा प्रकार नव्हता. पैशांचा प्रचंड वापर, सत्ता नसेल तर तुमच्या भागाची कामे होऊ शकणार नाहीत अशा धमक्या, लाडकी बहीणसारख्या योजनांमध्ये अपात्र महिलांना वाटलेले पैसे असेही अनेक प्रकार भाजपने केले. या सगळ्यांकडे निवडणूक आयोगाने डोळेझाक केली. ठाकरे सेनेचा महापौर मुसलमान होईल असे भाजपचे शहरअध्यक्ष अमित साटम वारंवार सांगत होते. यातून हिंदुत्वाचे विष पसरवण्याचे काम झाले. गुजराती व हिंदी भैय्ये एक झाले. राजकारणात डावपेच चालतातच. पण त्यात किमान काही नीतीमत्ता बाळगणे अपेक्षित असते. सर्व नीतीनियम विरोधी पक्षांना, आपण मात्र वाटेल तसे वागले तरी क्षम्य असा भाजपचा आविर्भाव आहे. परवा मतदानाच्या दिवशी पुसल्या जाणाऱ्या शाईबाबत उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतली तिला निवडणूक आयोगाची परवानगी होती का असा सवाल आशिष शेलार यांनी केला. पण त्यांचे अनेक नेते मतदानाच्या दिवशी पत्रकारांशी बोलले. इतकेच नव्हे तर शाई पुसण्याचे दाखवणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली. असंख्य खोट्या गोष्टी सतत सांगत राहणे असे प्रचारतंत्रच भाजपने विकसित केले आहे. त्यानुसार, ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या काळात विकासाला खोडा घातला, मेट्रो, कोस्टल रोड वगैरे कामे आम्हीच केली अशा बतावण्या भाजपने सतत केल्या. त्यांचा पर्दाफाश आदित्य ठाकरे यांनी केला. पण त्याचा उपयोग झाला नाही. वास्तविक मुंबईतील मराठी माणसाने संयुक्त महाराष्ट्रापासून आजवर अनेक लढाया केल्या आहेत व केंद्राच्या बलिष्ठ ताकदीसमोर नेहमीच तो विरोधात उभा ठाकला आहे. ठाकऱ्यांच्या सेनेला मत देत असतानाच दुसरीकडे दत्ता सामंतांच्या संघटनेचे हात बळकट करण्याचे चातुर्यही त्याने दाखवले आहे. पण दुर्दैवाने भाजपच्या हिंदुत्वाच्या प्रचाराला तो बळी पडला. भाजपने कुटील नीती वापरून त्याच्यात अनेक फाटाफुटीही घडवून आणल्या. त्या सर्वांचा परिपाक म्हणजे आजचा विजय आहे.

### शिंदे, दादांची गरज संपली

मुंबई ताब्यात घेण्यासाठी शिवसेना फोडणे किती आवश्यक होते याचे प्रत्यंतर निकालांच्या आकड्यांवरून येते. आज सेना एकसंध असती तर मुंबईत तर तिची सत्ता आली असतीच, पण ठाणे, नवी मुंबई, नाशिक आणि संभाजीनगर यांच्यावरही बहुदा तिचे वर्चस्व दिसले असते. भाजपच्या रणनीतीकारांची तारीफ करायची झाली तर ती अशी की त्यांनी आधी सेना फोडली, शिंदे सेनेला ताकद दिली, मुंबईतील मराठी टक्का दुरावू नये म्हणून शिंद्यांना सोबत ठेवले आणि आता अंतिम लढाईत शिंद्यांची ताकदही खच्ची होईल याची व्यवस्था केली. आज मुंबईत भाजप १०० च्या आसपास असताना शिंद्यांचा आकडा मात्र ठाकरे सेनेच्या निम्मा इतकाच आहे. म्हणजे उद्या तशीच गरज पडली तर भाजप शिंदे सेना फोडू शकते किंवा तिला लाथही मारू शकते. दुसरीकडे अजित पवार यांचा पुण्यातील दारुण पराभव ही या निवडणुकीतील सर्वात मोठी बातमी आहे. पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये अजितदादा भाजपला आव्हान देऊ लागले होते. भाजपच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढू लागले होते. पण पुण्यात त्यांच्या पक्षाला दोन आकडी संख्याही गाठता आलेली नाही. पिंपरीमध्ये बऱ्या जागा मिळाल्या असल्या तरी भाजपला त्यांची गरज उरलेली नाही. उद्या अजितदादांच्या नगरसेवकांची कोंडी करून त्यांच्यातही फोडाफोडी केली जाईलच. पूर्वी दादांचे असलेले आमदार भाजपने असेच पळवले आहेत. त्यामुळे शिंदे व अजितदादा या दोघांचेही हिशेब बऱ्यापैकी चुकते झाले आहेत. या बाकीच्या पालिकांच्या निकालांचे विश्लेषण आम्ही उद्या करूच. पण तूर्तास ठाकरे बंधूंच्या सेनेविषयी बोलणे आवश्यक आहे. अत्यंत प्रतिकूल स्थितीत त्यांनी जी लढत दिली तिची तारीफ करावी लागेल. त्यांनी आधीच ऐक्य घोषित करायला हवे होते, प्रचार अधिक जोमाने करायला हवा होता वगैरे गोष्टी खऱ्या आहेतच. ठाकरे बंधूंना आपल्यातले दोष काढून टाकून झटून काम केल्याशिवाय मोठे यश मिळणार नाही. त्यांनी मुंबई सोडून इतर पालिकांच्या निवडणुका जवळपास सोडूनच दिल्या होत्या. पण मुंबईकर मराठी लोकांनी त्यांना आपण भाजपच्या अनैतिक थैमानाच्या विरोधात लढू इच्छितो असा संदेशच जणू या निमित्ताने दिलेला आहे. त्याचा योग्य सन्मान करून ठाकरे बंधू या मराठी लोकांना साथ देतील व भाजपविरोधी राजकारण पुढे नेतील अशी अपेक्षा करायला हवी. चंद्रपूर व लातूरमध्ये स्थानिक जनतेने काँग्रेसला जी साथ दिली आहे ती काँग्रेसच्या नेत्यांसाठीही मार्गदर्शक आहे. ठाकरे यांच्याप्रमाणे काँग्रेसवालेही त्यापासून बोध घेतील अशी आशा आहे.

विचार

# धूर-प्रदूषणाच्या समस्या सोडवायच्या तर...

***आजकाल प्रदूषण आणि धुरामुळे घराबाहेर पडणाऱ्यांच्या समस्या वाढल्या आहेत. लोकांना श्वास घेण्यास त्रास होत आहे. बाहेर पडताना डोळे जळत आहेत. बहुतेक लोकांना सकाळी आणि संध्याकाळी घसा खवखवणे आणि खोकला येण्याच्या घटना वाढल्या आहेत. मुले आणि वृद्धांसह तरुणांमध्येही घशाच्या समस्या दिसून येत आहेत. त्यामुळे प्रदूषण आणि धुरामुळे जडणाऱ्या आरोग्य समस्या सोडवायचा विचार केला पाहिजे.***



मिलिंद बेंडाळे

वायू प्रदूषण किंवा धुरामुळे खोकला होतो किंवा श्वास घेण्यास त्रास होतो. प्रदूषित हवेत श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. हवेत असलेले धुळीचे कण आणि हानिकारक रसायने ही समस्या आणखी वाढवतात. हे टाळण्यासाठी, बाहेरील संपर्क कमी करण्याचा प्रयत्न करुन आवश्यकतेनुसार मास्क वापरणे आवश्यक बनले आहे. प्रदूषित हवेत जास्त काळ काम करणे किंवा बाहेर राहणे यामुळे डोळ्यांची जळजळ होऊ शकते. डोळ्यांमध्ये पाणी येणे किंवा डोळे लाल होणे यासारख्या समस्या येऊ शकतात. यावर घरी सहज उपचार करता येतात; परंतु समस्या वाढल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागतो. हवा प्रदूषित असेल तर डोळ्यांव्यतिरिक्त अन्य अवयवांनाही समस्या निर्माण होऊ शकतात. यामुळे नाकात जळजळ होणे किंवा नाक बंद होऊ शकते. हे टाळण्यासाठी बाहेर जाताना योग्य प्रकारे मास्क घालणे आवश्यक बनले आहे. हल्ली तर दीर्घकाळ प्रदूषित हवा आणि वातावरणात राहिल्यानेदेखील घशाच्या समस्या उद्‌भवताना दिसतात. अशा परिस्थितीत हवेतील रसायने घशाला संक्रमित करू शकतात आणि घसा खवखवणे आणि घशात जळजळ निर्माण करू शकतात. त्वचेवर पुरळ येणे किंवा खाज सुटणे ही गंभीर समस्या नाही; परंतु ती प्रदूषित हवेमुळे होऊ शकते. घरगुती उपायांनी त्यावर उपचार करणे शक्य आहे. वायू प्रदूषणातील रसायनांचा केसांवरही हानिकारक परिणाम होतो. यामुळे कोरडेपणा किंवा केस गळणे यासारख्या समस्या उद्‌भवू शकतात. परिसरात हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) पातळी जास्त असेल, तर बाहेर पडणे टाळणे हा महत्वाचा इलाज बनतो आहे. परिसरातील 'एक्यूआय' लाल किंवा नारिंगी असेल, तर प्राणायाम किंवा योगा करणे टाळणे उत्तम ठरते.

प्रदूषणात जावे लागल्यास घ्यावयाची काळजी हा पर्यावरणीय प्रदूषणाला तोंड देण्यासाठी आवश्यक ठरणारा मुद्दा बनला आहे. त्या दृष्टीने काही पथ्ये पाळायला हवीत. या काळात बाहेर जाताना मास्क घालणे आवश्यक बनले आहे. शक्य असल्यास, एअर प्युरिफायरही वापरायला हवे. घरातील प्रदूषण शक्य तितके कमी करण्यासाठी बाहेरील धूर घरात येणार नाही, हे पहावे लागणार आहे. हवा शुद्ध करणारी झाडे घराच्या गॅलरीत लावता येतील. घरात कोणत्याही प्रकारची सामग्री जाळणे टाळणेही महत्वाचे पाऊल ठरत आहे. (जसे की अगरबत्ती, धूप काड्या, कोळसा, मेणबत्त्या, लाकूड आदी.) धुळीचे कण श्वास घेण्याच्या समस्या वाढवू शकतात. त्यामुळे झाडू मारण्याऐवजी स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लिनर वापरणे श्रेयस्कर ठरते. प्रदूषणापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी प्रतिकारशक्ती वाढवावी. भरपूर फळे आणि भाज्या खाव्यात. प्रदूषणापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणे. यासाठी पुरेशा प्रमाणात 'व्हिटॅमिन सी' घेणे आवश्यक आहे. 'व्हिटॅमिन सी'मध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात. ते रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवतात, म्हणून अशा हवामानात पालक, हिरव्या पालेभाज्या, संत्री आणि हंगामी फळे खायची सवय कामी येऊ शकते. तुळशी किंवा आल्याच्या चहामधील घटक केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करत नाहीत, तर प्रदूषण आणि धुक्याचे परिणामदेखील कमी करतात. ऑलिव्ह ऑइल श्वसन प्रणाली निरोगी राखण्यासाठी खूप फायदेशीर ठरते. ते अनेक रोगांपासून वाचवतेच, पण रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते.

प्रगती आणि शहरीकरणाच्या सततच्या शर्यतीत आपली शहरे अनेकदा प्रदूषणाच्या काळ्या ढगात लपलेली असतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीवरून दिसून येते, की जागतिक लोकसंख्येपैकी सुमारे ९९ टक्के लोक जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांपेक्षा जास्त हवा श्वास घेतात आणि त्यात प्रदूषकांचे प्रमाण खूप जास्त आहे. त्याचा फटका कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना सहन करावा लागतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, २०१९ मध्ये शहरी आणि ग्रामीण भागात सभोवतालच्या (बाहेरील) वायू प्रदूषणामुळे जागतिक स्तरावर ४.२ दशलक्ष अकाली मृत्यू झाले. श्वसन रोग, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि अगदी अकाली मृत्यूसह अनेक आरोग्य समस्यांना वायू प्रदूषण कारणीभूत ठरते. प्रगतीचे केंद्र मानले जाणारे शहर, खराब हवेच्या गुणवत्तेच्या अनपेक्षित परिणामांना तोंड देत आहेत. मध्य लंडनमध्ये धुराचा श्वास घेणे हे अंदाजे ७० सिगारेट ओढण्यासारखे आहे. शहरी लोकसंख्या वाढत असताना या समस्येची तीव्रता वाढत आहे. यामुळे नाट्यमय बदल घडवून आणण्यासाठी कला, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मिलाफ करणारे नावीन्यपूर्ण उपाय शोधले गेले आहेत. असाच एक नवोपक्रम म्हणजे 'स्मॉग-फ्री टॉवर'. या अभूतपूर्व नवोपक्रमाने लक्ष वेधत भरपूर प्रशंसा मिळवली. कलाकार आणि नवोन्मेषक दान रुसेगार्डे आणि त्यांच्या टीमने विकसित केलेला हा टॉवर सात मीटरच्या प्रभावी उंचीवर उभा राहतो आणि व्हॅक्यूम चालवण्यासाठी फक्त १,१७० वॅट्सची शक्ती वापरतो.

चीनमधील टियांजिन, डालियान आणि बीजिंग, नेदरलँड्समधील रॉटरडॅम आणि पोलंडसारख्या शहरांमध्ये अलीकडेच 'स्मॉग-फ्री टॉवर्स' बसवण्यात आले आहेत. 'स्मॉग-फ्री टॉवर' हे मानवी कल्पकतेचे एक उत्तम उदाहरण आहे. शहरी वायू प्रदूषणाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी हा कला आणि तंत्रज्ञानाचा एक अद्वितीय संयोजन आहे. हा टॉवर एका साध्या पण प्रभावी तत्त्वावर चालतो. तो प्रदूषित हवा ओढतो, कण फिल्टर करतो आणि स्वच्छ हवा वातावरणात परत सोडतो. रुसेगार्डे त्याची तुलना एका महाकाय व्हॅक्यूम क्लिनरशी करतात आणि म्हणतात, की ते प्रति तास हवेतून तीस हजार घनमीटर स्मॉग कण काढून टाकते. हा टॉवर दीड दिवसात फुटबॉल स्टेडियमच्या क्षेत्रफळाएवढ्या धुराचे शोषण करतो. त्यामुळे वाऱ्याच्या प्रवाहावर अवलंबून ७० टक्क्यांपर्यंत स्वच्छ हवा तयार होते. त्याची आकर्षक आणि भव्य रचना शहरी लँडस्केपमध्ये एक प्रभावी भर घालते, जी केवळ कार्यात्मक हवा शुद्धीकरण म्हणूनच नाही, तर हवामान संकटाचा सामना करण्याच्या प्रगतीचे एक शक्तिशाली प्रतीक म्हणूनदेखील काम करते. 'स्मॉग-फ्री टॉवर'चे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याचे नावीन्यपूर्ण हवा शुद्धीकरण तंत्रज्ञान. आयनीकरण नावाच्या प्रक्रियेचा वापर करून, टॉवर एक स्थिर विद्युत क्षेत्र तयार करतो; जे हवेतील प्रदूषकांना आकर्षित करते आणि अडकवते. या टॉवरमधील प्रत्येक रिंग एक हजार चौरस मीटर स्वच्छ हवेइतकी असते. गुंतागुंतीच्या पद्धतीने तयार केलेल्या धुराच्या या रिंगची किंमत प्रति रिंग २५० युरो आहे.

'स्मॉग-फ्री टॉवर'चा पर्यावरणीय परिणाम कमी लेखता येणार नाही. हवेतून मोठ्या प्रमाणात प्रदूषक काढून टाकल्याने, ते खराब हवेच्या गुणवत्तेशी संबंधित तात्काळ आरोग्य धोके कमी करण्यास मदत करते. शिवाय गोळा केलेल्या प्रदूषकांचे दागिन्यांमध्ये रूपांतर करून हा प्रकल्प वायू प्रदूषणाच्या समस्येबद्दल जागरूकता निर्माण करतो. त्याच्या थेट फायद्यांव्यतिरिक्त धूरमुक्त टॉवर हे नावीन्यपूर्णता, सहकार्य आणि शाश्वत विकासासाठी सामायिक वचनबद्धतेद्वारे मानवजात काय साध्य करू शकते याचे एक उत्तम प्रतीक आहे.

हा टॉवर केवळ हवा स्वच्छ करत नाही, तर समोरील आव्हानांबद्दलचा आपला दृष्टिकोनदेखील स्पष्ट करतो. त्यामुळे समस्यांवर सर्जनशील उपायांच्या संधी म्हणून पाहण्यास प्रोत्साहित केले जाते. धूरमुक्त टॉवर हे शहरी वायू प्रदूषणाविरुद्धच्या लढाईत नावीन्यपूर्णता आणि प्रेरणा यांचे प्रतीक आहे. कला, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या संगमाद्वारे गंभीर पर्यावरणीय समस्या सोडवणे कसे शक्य आहे हे ते सुंदरपणे दाखवते. आपली शहरे विकसित होत असताना, धूरमुक्त टॉवरसारखे उपाय आपल्याला आठवण करून देतात, की येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ आणि निरोगी भविष्य निर्माण करण्याची शक्ती आपल्याकडे आहे.

**(लेखकनिसर्ग आणि प्राणीजीवनाचे अभ्यासक असून जंगलांमध्ये अनेक प्रकारचे संशोधन करतात.)**

# भटक्या कुत्र्यांचा वाली कोण



वैभव पाटील

मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवाला आळा बसवण्यासाठी गतवर्षी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया व श्वान दंश प्रतिबंधक लसीकरणावर भर दिला होता. मात्र, हा उपक्रम फारसा यशस्वी ठरला नाही. चेंढरे, थळ व चौल ग्रामपंचायतमध्ये हा उपक्रम राबविला. त्यानंतर ही मोहिम थांबविण्यात आली. त्यामुळे ही मोहिम जिल्हा परिषदेचा फक्त दिखावाच अशा प्रकारची चर्चा सध्या जोर धरत आहे. जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात ठिकठिकाणी कुत्र्यांचा झुंड दिसून येत आहेत. अनेक वेळा हे कुत्रे माणसांवर एकत्रीत हल्ले करतात. त्यामुळे जीव गमविण्याची भिती अधिक असते. काही वेळा दुचाकीवरून प्रवास करीत असताना कुत्रे अंगावर येतात. त्यामुळे अपघात होण्याची भिती देखील असते. गावे, वाड्यांमध्ये कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

मात्र, स्थानिक प्रशासनाकडून त्यांच्यावर ठोस कारवाई केली जात नाही. त्याचा परिणाम नागरिकांना विशेष करून लहान मुलांना दहशतीच्या खाली राहवे लागत आहे. मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकजण जखमी झाले आहेत. त्यामुळे भितीचे वातावरण पसरत आहे. यावर ठोस उपाय म्हणून रायगड जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने मागील वर्षी जिल्हा परिषद सेस फंडातून २५ लाख रुपयांची तरतूद करून मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया व श्वान दंश प्रतिबंधक लसीकरण करण्यावर भर दिला होता. पुणे येथील युनिर्वसल ॲनिमल वेलफेअर या एजन्सीला हे काम देण्यात आले होते. २५ फेब्रुवारी २०२४ पासून या कामाला सुरूवात करण्यात आली होती. यासाठी पेणमध्ये एक केंद्र उभारण्यात आले होते. मोकाट कुत्र्यांना पकडणे, त्यांना त्या सेंटरमध्ये आणणे, निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया करणे, त्यांची उत्पत्ती थांबविण्यासाठी व रेबीजपासून बचाव करण्यासाठी श्वान दंश प्रतिबंधित लसीकरण देण्याचे काम करण्यात आले होते. सुरुवातीला अलिबाग तालुक्यातील चेंढरे, चौल व थळ ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. या ग्रामपंचायत हद्दीतील २०७ कुत्र्यांचे निर्बिंजीकरण व लसीकरण करण्यात आले.

मात्र मार्च अखेर कंपनीचा ठेका संपल्याने या मोहिमेला ब्रेक लागला. त्यामुळे फक्त बोटावर मोजण्या इतक्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील मोकाट कुत्र्यांचे लसीकरण निर्बिजीकरण करण्यात आले. ही मोहिम होऊन दीड वर्षे होत आली आहेत. मात्र अजूनपर्यंत जिल्हा परिषदेने ही मोहिम पूढे चालू ठेवली नाही. त्यामुळे फक्त मोहिमेचा दिखावा केल्याची चर्चा सुरु आहे. जिल्ह्यामध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत वाढली आहे. कुत्र्यांचे हल्ल्यांमुळे नागरी सुरक्षा धोक्यात आली आहे. २०२२ पासून आजपर्यंत सात हजारहून अधिक नागरिकांवर कुत्र्यांनी हल्ले केले आहेत. त्यात दोन हजार २०७ जणांना गंभीर दुखापत झाल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आल्याची माहित उपलब्ध झाली आहे. जिल्ह्यात कुत्रे पाळण्याचा फॅड वाढला आहे. पशुसंवर्धन विभागाकडून मार्गदर्शन घेऊन पाळीव कुत्र्यांवर उपचार केले जातात. परंतु मोकाट कुत्र्यांना काही मंडळी पाळत असतात. त्यांची देखभाल करीत असतात. मात्र त्यांच्यावर पशुसंवर्धन विभागामार्फत उपचार केले जात नाही. त्याचा परिणाम कुत्र्यांची संख्या भरमसाठ वाढली जाते. जिल्हयात ग्रामीण भागासह शहरी भागात मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली आहे. नाक्यानाक्यावर मासांहाराचे पदार्थ खाऊन मोकाट कुत्रे जगतात. काही ठिकाणी या कुत्र्यांना जेवण घालतात. त्यामुळे ठिकठिकाणी या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. दुचाकी अथवा चारचाकी वाहनाने प्रवास करणाऱ्या चालकांसह शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांवरदेखील कुत्रे एकजूटीने हल्ला करतात. मागील वर्षी अलिबाग शहरात हा प्रकार घडला होता. आताही तीच परिस्थिती आहे.

भारतात भटक्या कुत्र्यांची समस्या गेल्या काही वर्षांत गंभीर स्वरूप धारण करत आहे. सध्या देशभरात अंदाजे सहा कोटी मोकाट कुत्री असल्याचे पशुकल्याण मंडळ सांगते. हे कुत्री दरवर्षी लाखो लोकांवर हल्ले करतात, त्यापैकी अनेक हल्ले जीवघेणे ठरतात. रेबीजसारख्या रोगामुळे भारतात दरवर्षी २० हजारांहून अधिक मृत्यू होतात, ज्यामुळे भारताला जगातील रेबीज राजधानी मानले जाते. एवढेच नव्हे, तर हे कुत्रे रस्ते अपघातांचे मोठे कारण आहेत.

लोकसंसद

## इराणमधील खोमेनी यांच्या सत्तेला सुरुंग

इराणमधील खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेला नागरिकांचा उद्रेक थांबायचे नाव घेत नाही. इराणमध्ये खोमेनी सरकारच्या विरोधात गेल्या पंधरा दिवसांपासून जनतेचे मोठे आंदोलन चालू असून या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले आहे. या हिंसक आंदोलनात आतापर्यंत ५४४ जणांचा बळी गेला असून १० हजाराहून अधिक आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. हजारो आंदोलकांना अटक व ५४ आंदोलकांचा बळी जाऊनही इराणी नागरिक खोमेनी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरतच आहेत. खोमेनी सरकार हे आंदोलन चिरडण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे मात्र आंदोलक कोणत्याही परिस्थितीत आंदोलन थांबवण्याच्या मानसिकतेत नाही. तेथील परिस्थिती हाताबाहेर गेल्याने भारतानेही इराणमधील आपल्या नागरिकांना लवकरात लवकर इराण सोडण्याचे आव्हान केले आहे. खोमेनी सरकार उलथवून टाकायचेच अशा मानसिकतेत आंदोलक असल्याने हे आंदोलन आणखी भडकण्याची शक्यता आहे. इराणमधील या आंदोलनाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या आंदोलनाला अमेरिकेची फूस असल्याची चर्चा जागतिक माध्यमात आहे. चीन, रशिया या देशांनी तर तसा थेट आरोपच केला आहे. अर्थात हा आरोप चुकीचा आहे असे कोणीही म्हणणार नाही. डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून इराणवर त्यांची वक्रदृष्टी होतीच. इस्राईल - इराण युद्धात ही अमेरिकेने इराण विरोधात भूमिका घेतली होती. इराणमधील खोमेनी सरकार उलथवून टाकणार असे ते कायम म्हणत आले आहेत. इराणमधील खोमेनी सरकार मानव अधिकारांचे उल्लंघन करीत असल्याने इराणवर अमेरिका हल्लाही करू शकते असा सज्जड दमही ट्रम्प यांनी इराणला दिला होता त्यामुळे इराणमधील या आंदोलनाला हवा देऊन खोमेनी यांचा परस्पर काटा काढण्याचा ट्रम्प यांचा डाव असू शकतो. व्हेनेझुएला प्रमाणे इराणमधील तेलसाठ्यावर देखील ट्रम्प यांची नजर आहे. खोमेनी अमेरिकेला ते सहजासहजी ते मिळवू देणार नाही म्हणून ते या आंदोलनाला धगधगत ठेवून खोमेनी यांचा काटा काढत आहे हे सत्य आहे. अमेरिका या आंदोलनाला पेटवत आहे हे जरी खरे असले तरी या आंदोलनाला खोमेनी हे स्वतःही तितकेच जबाबदार आहेत. रियाल हे इराणचे चलन आहे. रियालचे गेल्या काही वर्षात प्रचंड अवमुल्यन झाले आहे. १ लाख ४० हजार रियाल म्हणजे १ डॉलर अशी रियालची अवस्था झाली आहे. कदाचित हे आंदोलन खोमेनी यांचे सरकार उलथवूनही टाकेल.

**– श्याम ठाणेदार, ठाणे**

दिनविशेष

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज ; प्रा.डॉ.एन.डी.पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज चौथा स्मृतिदिन. चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. (१९६२) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला. शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार, ठाणे**

# मिसिंग लिंकची प्रतीक्षा!

## • बोरघाटातील जलद प्रवास लांबणीवर; मुंबई-पुणे अंतर घटणार




| खोपोली | प्रतिनिधी |

खालापूर-मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटाला पर्यायी मार्ग म्हणून डोंगर चिरून मिसिंग लिंक तयार करण्यात येत आहे. मुंबई-पुणे अंतर आठ किलोमीटरने कमी, अपघात आणि वीकेंडला होणारी वाहतूक कोंडीची कटकट संपणार असल्याने या मार्गावरून प्रवास करण्यासाठी दोन वर्षांपासून प्रतीक्षा सुरू आहे. २०२४ नंतर डिसेंबर २०२५ संपले तरी काम अपूर्ण आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर टोलनाका ते बोरघाट हद्दीत सर्वाधिक अपघात झाले आहेत. यावर पर्याय म्हणून ६६९५.३७ कोटी रुपये खर्ज करून मिसिंग लिंक तयार केला जात आहे. मिसिंग लिंक खालापूर टोलनाका ते थेट लोणावळा हद्दीत सिंहगड कॉलेज असा असणार आहे.

ऑफकॉन कंपनी मिसिंग लिंकचे काम करत असून, नवयुग इंजिनिअरिंग बोगद्याचे काम करीत आहे. मिसिंग लिंकसाठी सह्याद्री पर्वतरांगांतून चावणी गावाच्या हद्दीत वायर लूप पद्धतीच्या पुलाचे काम सुरू आहे. या पुलाची जमिनीपासूनची उंची १३५ मीटर असणार आहे, तर पुलाची लांबी ६४५ मीटर असणार आहे.

याशिवाय ९०० मीटर लांबीचे दोन समांतर पूल असणार आहेत. द्रुतगती मार्गावर तीन पुलांना चौथ्या मार्गिकेत समांतर पूल बांधण्यात येत आहेत. याशिवाय डोंगराच्या पोटातून १५० मीटर खालून दोन समांतर बोगदा आहे.येथील पहिला बोगदा १.७५ किलोमीटर लांबीचा असून, त्याला समांतर बोगदा असणार आहे. दुसऱ्या बोगद्याची लांबी ८.९२ किलोमीटर असून, या बोगद्यालासुद्धा समांतर दुसरा बोगदा असणार आहे. बोगद्याची रुंदी २१. ४५ मीटर आहे.

### मिसिंग लिंकचे फायदे

**सर्वाधिक अपघाताचा टप्पा वगळला जाणार असून, बोरघाटात कायम दरडीचा असलेला धोका मिसिंग लिंकवर नसेल. घाटाचा होणारी वाहतूक कोंडीतून सुटका होऊन अंतर कमी झाल्याने २० ते २५ मिनिटे जलद प्रवास होणार आहे.**

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## सघोष पथसंचलनाचे आयोजन

**माणगाव** : राष्ट्र सेविका समिती, रायगड जिल्ह्याच्या वतीने भव्य व शिस्तबद्ध सघोष पथसंचलन रविवारी (दि. १८) माणगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात जिल्ह्यातील सेविकांचा मोठ्या संख्येने सहभाग असणार आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या पथसंचलनाचा प्रारंभ अशोक दादा साळवे विद्यालय, कचेरी रोड, माणगाव येथून होणार आहे. त्यानंतर डॉ. वैद्य हॉस्पिटल साई मंदिर निजामपूर रोड मुख्य बाजारपेठ कचेरी रोड असे मार्गक्रमण करून पुन्हा अशोक दादा साबळे विद्यालय येथे कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. प्रेरणादायी पथसंचलनाला साथ द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## रायगड मेडिकल असोसिएशनचे वार्षिक अधिवेशन

| कर्जत | प्रतिनिधी |

रायगड मेडिकल असोसिएशनचे वार्षिक रायकॉन २०२६ हे दोन दिवसीय अधिवेशन कर्जतमध्ये साल्ट ओलेंडर फार्म येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या अधिवेशनाचे अध्यक्षपद डॉ. आशुतोष कुलकर्णी यांनी भूषविले. उद्घाटनप्रसंगी कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे आणि प्रख्यात इतिहास संशोधक प्रा. डॉ. कुरुष दलाल उपस्थित होते. यावेळी संपूर्ण रायगड जिल्ह्यातील ७०० डॉक्टर्स उपस्थित होते.

या अधिवेशनाची जबाबदारी अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांच्यासह रायगडचे सचिव डॉ. प्रशांत गांगल आणि खजिनदार डॉ. कुमार ओसवाल आणि त्यांचे कर्जत मेडिकल असोसिएशनचे सर्व पदाधिकारी आणि सभासद यांनी यांनी उचलली होती.यावेळी संपादक डॉ. दिलीप सावळे यांनी संपादन केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

कैंसर, स्त्रीरोग, आयुर्वेद, होमिओपॅथी, अस्थिरोग, हृदयविकार, मेंदूविषयी आजार, इतिहासकारांच्या नजरेतून भारतीय खाद्यसंस्कृती अशा अनेक विषयांवर संपूर्ण दोन दिवस व्याख्यानाद्वारे डॉक्टरांना मार्गदर्शन करण्यात आले.

या अधिवेशनामधे रायकॉन २६ चे प्रमुख सल्लागार डॉ. प्रेमचंद जैन, साइंटिफिक चेयरमैन डॉ. गंगोलिया, कर्जत मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशिष कर्वे, डॉ. मनोहर साबणे, माजी अध्यक्ष डॉ. निलकंठ फडके, चीफ ऑर्गनायझिंग चेयरमैन डॉ. गणेश साळुंखे, यांसह सर्व कर्जत मेडिकल असोसिएशनच्या सभासदांनी परिश्रम घेतले.

## पारंपरिक बांबू व्यवसाय अडचणीत

| रायगड | प्रतिनिधी |

बांबूपासून वस्तू तयार करणे ही अत्यंत कष्टाची आणि कौशल्यपूर्ण प्रक्रिया आहे. जंगल किंवा मळ्यातून बांबू कापूण ते वाळवत, त्यावर प्रक्रिया करणे. ही सर्व प्रक्रिया घडल्यानंतर त्या बांबूपासून चाळण्या, टोपल्या, सुप, झाडू, चटई, धान्य साठवणुकीच्या पेट्या इत्यादी वस्तू साकारल्या जातात. या सर्व प्रक्रियेस खूप मेहनत असून वेळही जास्त लागतो. इतक सर्व करूनही बाजारात बांबूच्या वस्तूंना म्हणावे तसे दर मिळत नाहीत. परिणामी अनेकांनी हा पारंपरिक व्यवसाय सोडून शेतीमजुरी किंवा छोटे-मोठे व्यवसाय स्वीकारले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने बांबू लागवड वाढवून रोजगारनिर्मिती व आर्थिक लाभ साध्य करण्यासाठी विशेष नियोजन जाहीर करण्यात आले होते. या अनुषंगाने विविध भागांत मार्गदर्शन शिबिर घेत शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. मात्र, शासनाची ही योजना कागदावरच राहिल्याने बांबू कारागिरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

एकेकाळी ग्रामीण भागात जवळपास प्रत्येक घरात बांबूच्या वस्तू हमखास आढळायच्या. स्वयंपाकघर, शेतीकाम, धान्य साठवणूक अशा विविध कामांसाठी बांबूच्या वस्तूंचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. मात्र, कालांतराने स्वस्त, हलक्या, आकर्षक आणि सहज उपलब्ध असलेल्या प्लॅस्टिकच्या वस्तूंनी बाजारपेठ काबीज केली आहे. त्यामुळे ग्राहकांचा कल प्लॅस्टिककडे झुकला आणि बांबू वस्तूंची मागणी मोठ्या प्रमाणात घटली. त्यामुळे शासनाने बांबू लागवडीवर भर देण्याबरोबरच तयार वस्तूंना बाजारपेठ, योग्य दर, शासकीय खरेदी व प्रचार-प्रसाराची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे मत बांबू कारागिरांकडून व्यक्त होत आहे. प्लॅस्टिकमुळे होणारे प्रदूषण, आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचे धोके लक्षात घेता बांबू वस्तूंचा वापर वाढवणे ही काळाची गरज असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

आधुनिकतेच्या नावाखाली बांबूच्या वस्तू केवळ शोभेच्या वस्तू म्हणून वापरल्या जाऊ लागल्याने मूळ उपयोगिता बाजूला पडत चालली आहे, असे मत रूपेश जामकर यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, पूर्वी आमच्या वस्तूंना मोठी मागणी होती. आता प्लॅस्टिकमुळे आमचा व्यवसाय जवळजवळ बंद पडला आहे. मेहनत जास्त आणि मोबदला कमी असल्याने अनेकांनी हा व्यवसायदेखील सोडला आहे.

## एन.सी.सी.विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

| रायगड | प्रतिनिधी |

भौगोलिक रचनेमुळे रायगड जिल्हा आपत्तीप्रवण म्हणून ओळखला जातो. दरवर्षी जिल्ह्यात पूरस्थिती, दरड कोसळण्याच्या घटना, चक्रीवादळ, अतिवृष्टी, आगीचे प्रकार तसेच औद्योगिक अपघात यांसारख्या विविध स्वरूपाच्या आपत्ती सातत्याने घडत असतात. जिल्ह्यात आपत्ती निवारणासाठी आवश्यक तेवढे प्रशिक्षित मनुष्यबळ कमी पडत असल्याची बाब अनेक वेळा अधोरेखित झाली आहे.

या उपक्रमाअंतर्गत रायगड जिल्ह्यातील निवडक १७५ एन. सी. सी. कॅडेट्ससाठी २ जानेवारीपासून आठ दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर अलिबाग येथील जे. एस. एन. कॉलेज परिसरात यशस्वीरीत्या पार पडले. या प्रशिक्षण शिबिरासाठी भारतीय सेनेच्या माध्यमातून तज्ज्ञ प्रशिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. आठ दिवस चाललेल्या या शिबिरात विद्यार्थ्यांना आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील बचाव व मदतकार्य, प्राथमिक उपचार पद्धती, शोध व बचाव कार्य, दोरखंडाच्या साहाय्याने बचाव तंत्र, पाण्यातील बचावकार्य, आग नियंत्रणाच्या उपाययोजना तसेच ढिगाऱ्याखाली अडकलेल्या व्यक्तींना सुरक्षित बाहेर काढण्याच्या पद्धती यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

यासोबतच आपत्तीच्या प्रसंगी विविध यंत्रणांमध्ये समन्वय कसा साधायचा, नेतृत्वगुण कसे विकसित करायचे, शिस्त पाळत मानसिक स्थैर्य कसे राखायचे, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. केवळ सैद्धांतिक माहितीपुरती मर्यादा न ठेवता प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांवर विशेष भर देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना वास्तव परिस्थितीत काम करण्याचा अनुभव मिळाला.

## घरकुलांच्या छतावरील सौर संचासाठी मिळणार सीएसआर फंड

| रायगड | प्रतिनिधी |



राज्याच्या तिजोरीत खडखडाट असल्याने आता प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थींना घरकुल बांधकाम पूर्ण झाल्यावर छतावर सौरसंच बसविण्यासाठी सीएसआर फंडातून किंवा शासनाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमातून आर्थिक मदत केली जाणार आहे. राज्याच्या ग्रामविकास विभागाने तसा आदेश काढला आहे. त्यानुसार जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कार्यवाही करावी लागणार आहे.

घरकुल पूर्ण झाल्यावर लाभार्थीने विद्युतजोडणी केल्याची अधिकाऱ्यांनी खात्री करावी. त्यानंतर पीएम सूर्यघरच्या राष्ट्रीय पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करावी. महावितरणमार्फत पडताळणी करून मंजुरी घ्यावी. लाभार्थीला घरकुलाच्या छतावर सौर संच बसविण्यासाठी पहिल्यांदा स्वत:चे पैसे गुंतवावे लागतील. पण, लाभार्थीकडे पैसे नसल्यास महावितरणचा पुरवठादार शासनाचे अनुदान येईपर्यंत स्वत:ची रक्कम गुंतवायला तयार आहे की नाही?, याची खात्री करावी.

दोघेही तयार नसल्यास लाभार्थी बँकेतून कर्ज घेऊ शकेल किंवा राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाअंतर्गत स्वयंसहाय्यता गट, ग्राम संघ किंवा प्रभाग संघातून बिनव्याजी, कमी व्याजदरात कर्ज घेऊ शकेल. कोल्हापूर व वर्धा जिल्ह्यात असा प्रयोग करण्यात आला आहे. याशिवाय सीएसआर फंड किंवा इतर नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून सौरसंच बसविण्यास मदत करता येईल, असेही ग्रामविकास विभागाच्या आदेशात नमूद आहे. सौर संच बसविल्यावर केंद्राच्या ३० हजार आणि राज्याच्या १५ हजार रुपयांच्या अनुदानासाठी लाभार्थी पुढील कार्यवाही करू शकणार आहे.

घरकुल लाभार्थींना २.१० लाख अनुदानपंतप्रधान आवास योजनेतून लाभार्थीस सध्या एक लाख २० हजार रुपये बांधकामासाठी मिळतात. याशिवाय मनरेगातून घरकुल बांधकामाची ९० दिवसांची मजुरी २८ हजार ८० रुपये मिळते. स्वच्छ भारत मिशनमधून शौचालयासाठी १२ हजार रुपये दिले जातात. आता ४ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार ५० हजार रुपये राज्य शासनाकडून मिळणार आहेत. त्यातील ३५ हजार रुपये बांधकामासाठी आणि १५ हजार रुपये सौर संच बसविल्यावर मिळणार आहेत.

## जेन झेड, थॉट्स वॉल उपक्रमाचे उद्घाटन

**माणगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद डीबीएटीयूच्या वतीने जेन झेड, थॉट्स वॉल उपक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ.अमित शेष यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याला विद्यापीठाचे डीन प्रा. डॉ. संजय नलबलवार, उमेश काकडे, प्रा. सूरज शेलार, प्रा. डॉ. नीरज कुलकर्णी, प्रा. साळुंखे, प्रा. कुरेशी आणि प्रा. सिद्धार्थ घोंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये 'चालता-बोलता', पॉडकास्ट तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक, उद्योजकता विकास, स्वावलंबी भारत, महिला सशक्तीकरण, विकसित भारत, महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या खुल्या निवडणुका आदी विषयांवरील चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले विचार, मते व दृष्टिकोन मुक्तपणे व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

---

**शाळेतील विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव** | **शिपुरकर, वाघरे शाळेचा प्रेरणादायी उपक्रम**

## विज्ञान, हस्तकला प्रदर्शनातून सर्जनशीलतेचा आविष्कार

| माणगाव | प्रतिनिधी |

शैक्षणिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेत यावर्षीही विज्ञान, कला, शिल्प आणि हस्तकला यांचे भव्य वार्षिक प्रदर्शन भरविण्यात आले. शुक्रवारी (दि.१६) सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन अडानी सिमेंट कंपनीचे दिनकर सोनसूरकर आणि शुभम कामडी यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ, उद्योजक नितीन बामगुडे, शिपुरकर, स्नेह ओसवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




यावेळी पालक, शिक्षक, विज्ञानप्रेमी, कला रसिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलात्मक व वैज्ञानिक प्रयोगांचा आस्वाद घेतला. लहानग्यांच्या हातून साकारलेल्या प्रयोगात्मक मॉडेल्स आणि कलाकृती पाहताना अनेक जण थक्क झाले. तर काही पालकांच्या डोळ्यांत अभिमानाचे अश्रू तरळताना दिसून आले. या विज्ञान व हस्तकला प्रदर्शनात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

पर्यावरण संतुलन, प्रदूषण नियंत्रण, ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल, वाढते तापमान, संगणक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता व त्याचे फायदे व मर्यादा, निसर्ग संवर्धन, विकसित भारत अशा विविध विषयांवर आधारित विज्ञान मॉडेल्स आणि प्रात्यक्षिके मांडण्यात आली होती.

ही मॉडेल्स केवळ माहिती देणारी नसून कारण, परिणाम, वैज्ञानिक तर्क, समस्या आणि उपाय यांची सोपी आणि प्रभावी मांडणी करणारी होती. विद्यार्थ्यांनी संशोधनाची प्रक्रिया समजून घेत, प्रत्यक्ष कृतीतून विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. हस्तकला व कला विभागातही पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाचा वैज्ञानिक संदेश स्पष्टपणे दिसून आला.

### एकत्रित सादरीकरण

संपूर्ण शैक्षणिक वर्षभर विविध वैज्ञानिक, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी निरीक्षण, संशोधन, विश्लेषण आणि सर्जनशील अभिव्यक्तीच्या आधारे तयार केलेल्या उत्कृष्ट कलाकृती आणि वैज्ञानिक मॉडेल्सचे एकत्रित सादरीकरण या प्रदर्शनात करण्यात आले होते. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना सहभागाची संधी देत, त्यांच्या विचारांना योग्य दिशा आणि व्यासपीठ देण्याचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

---

# निवडक

## पेन्शनरांसाठी रोहा येथे विशेष मेळावा

**रोहा** : ईपीएस-९५ पेन्शनरांच्या विविध मागण्यांबाबत माहिती देण्यासाठी राष्ट्रीय संघर्ष समिती, रोहा यांच्या वतीने १८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ नागरिक सभागृह, रोहा येथे विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.गेल्या नऊ वर्षांपासून कमांडर अशोक राऊत यांच्या नेतृत्वाखाली पेन्शन वाढ व अन्य मागण्यांसाठी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा सुरू आहे. यासंदर्भातील पुढील रणनीती तसेच अद्ययावत माहिती पेन्शनर सभासदांना या मेळाव्यात देण्यात येणार आहे. रोहा तालुका तसेच शेजारील तालुक्यांतील सर्व ईपीएस-९५ पेन्शनर्सना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.मेळाव्यास पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर, महाराष्ट्र राज्य संघटक अजित घाडगे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष इंद्रजीत राजपूत, पुणे जिल्हा समन्वयक दिलीप कहाणे, नवी मुंबई अध्यक्ष विनायक तेंडुलकर, पांडू पाबरेकर, सचिव देवराम कर्णेकर व खजिनदार नंदकुमार भादेकर हे प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## खालापूर तालुक्यात १,१०,९८२ मतदार

**रसायनी :** खालापूर तालुक्यातील ४ जिल्हा परिषद गट व ८ पंचायत समिती गणासाठी ११०९८२ मतदार मतदान करतील अशी माहिती खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. खालापूर तालुक्यातील ४ जिल्हा परिषद व ८ पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेऊन सादर केला. खालापूर तालुक्यातील जिल्हा परिषद गट चौक, सावरोली, वासांबे व आत्कारगाव हे चार जिल्हा परिषद गट असून चौक हाळखुर्द, वासांबे, रीस, वाशिवली, सावरोली, खानाव व आत्कारगाव हे ८ पंचायत समिती गण आहेत. एकूण मतदार ११०९८२ असून पुरुष ५५६७६ तर स्त्री ५५३०३ आहेत. वासांबे व सावरोली सर्वसाधारण असून आत्कारगाव सर्वसाधारण स्त्री आणि चौक अनुसूचित जमाती स्त्री साठी राखीव ठेवण्यात आले आहे. तर पंचायत समिती गण रीस, खानाव हे सर्वसाधारण, चौक अनुसूचित जमाती स्त्री, हाळखुर्द अनुसूचित जमाती, वासांबे नामाप्र. वाशिवली नामाप्र. स्त्री, सावरोली व आत्कारगाव सर्वसाधारण स्त्री राखीव असल्याचे सांगण्यात आले. चौक गटात ३६, वासंबे गटात ३६, सावरोली ३८ तर आत्करगाव गटात ३४ अशी १४४ मतदान केंद्र असून सर्व केंद्र सुस्थितीत आहेत असे सांगण्यात आले आहे.

## जय शेट्ये यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**कर्जत** : कर्जत शहरातील वाहतूक समस्या बिकट आहे. ही समस्या सोडविण्यासाठी सर्वांच्या साथीने प्रयत्न करू. आता जास्त स्पीडच्या नवनवीन गाड्या येत आहेत. विद्यार्थ्यांनो अभ्यास स्पीडने करा, मात्र गाडी हळू चालवा, असा महत्वापूर्ण सल्ला विभागीय परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक जय शेट्ये यांनी विद्यार्थ्यांना दिला.कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलच्या सहकार्याने रस्ता सुरक्षा जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विभागीय परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक जय शेट्ये यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. उद्घाटन समारंभ झाल्यानंतर विभागीय परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक शेट्ये आणि सुराटकर यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कल्याणी सुराटकर, डॉ. निलोफर खान, डॉ. रुपाली येवले, समर्थ मोटार ट्रेनिंग स्कूलचे निलेश मराठे, अभिजीत मराठे आदी याप्रसंगी उपस्थित होते. उप प्राचार्य डॉ. अमोल चांदेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कल्याणी सुराटकर यांनीही मनोगत व्यक्त केले. आसावरी चव्हाण आणि साहिल चौधरी या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी प्रा. विशाल शेळके, प्रा. मुक्ता गोचाटे, प्रा. पूजा डांगर, प्रक्रिती सिंग आदी उपस्थित होते.

## मुरुडमध्ये रक्तदान शिबीर उत्साहात



**कोर्लई** : श्री जगद्गुरु नरेंद्र महाराज नाणीज धाम (महाराष्ट्र) यांच्या प्रेरणेने आयोजित जीवनदान महाकुंभ -२०२६ उपक्रमात दि.४ ते १८ जानेवारीपर्यंत दरवर्षीप्रमाणे १५ दिवस चालणाऱ्या या महाकुंभाद्वारे रुग्णांना विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याचा महान उपक्रम संस्थानतर्फे राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून तालुक्यातील मुरुड-मजगांव व साळावमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.१६) मुरुड येथील जय मल्हार कोळी समाज हॉलमध्ये जगद्गुरु नरेंद्र महाराज यांना वंदन करून मान्यवरांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुरुड तालुका सेवा समिती अध्यक्ष अंकुश वाडकर, जितेंद्र पाटील, नरेंद्र हेदुलकर, मधूकर ठाकूर, अनंत भगत, अंजली जगताप, किशोर भगत, सुधीर पूलेकर, संतोष चोरघे, निखिल पाटील, प्राची पाटील, मधूकर जासुद, बाबा डयला, किरण पाटील, ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. पुणे येथील ओम ब्लड बँकेच्या डॉ. प्रियंका गावडे यांनी व त्यांच्या टिमने रक्त संकलन केले.

## सौरभ हंबीरची विजयाला गवसणी

**पाली/गोमाशी :** श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ आणि स्थानिक उत्सव समिती, महाड यांच्यातर्फे प्रतिवर्षीप्रमाणे स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवक दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय किल्ले रायगड गडारोहण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी (दि.११) सकाळी ७ वाजता स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेत वेगवेगळ्या वयोगटात ४५० स्पर्धाकांनी सहभाग घेतला असून ही स्पर्धा यावर्षी एकूण आठ गटांमध्ये घेण्यात आली. यामध्ये सुधागड तालुक्यात चेरफळ वाडीतील सौरभ हरिकेश हंबीर याने २६ मिनिटात रायगड किल्ला सर करून चौथा क्रमांक यावेळी मिळविला. सुधागड तालुक्यातील उध्दर पंचक्रोशीत चेरफळ वाडीतील सौरभ हरिकेश हंबीर याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. धावण्याचा सराव करण्यासाठी त्याचे वडील हरिकेश मदत करीत आहेत. त्याच्याच वाडीतील राजू बांगारे, हरिकेश हंबीर, संजय निरगुडे, मनोहर हंबीर, साईल हंबीर यांनीही सहभाग घेऊन स्पर्धा पूर्ण करून प्रमाणपत्र मिळविले.

# सैनिकी तालुक्यात सुविधांचा अभाव



**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड व पोलादपूर तालुके केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे, तर सैनिकी परंपरेच्या दृष्टीनेही राज्यात वेगळे स्थान राखून आहेत. शिवकाळापासून या परिसरातील ग्रामीण तसेच घरपट्टी भागातील नागरिक मोठ्या प्रमाणावर सैन्यात दाखल झाल्याचा इतिहास उपलब्ध आहे. स्वराज्याच्या रक्षणासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात या भागातील तरुणांनी मोलाची भूमिका बजावल्याचे दाखले आढळतात. हीच परंपरा पुढे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सैन्यात आणि स्वतंत्र भारताच्या सैन्यातही निष्ठेने पुढे नेण्यात आली आहे.

सेवानिवृत्त सैनिकांना पेन्शन, वैद्यकीय, शासकीय कागदपत्रे, माजी सैनिक कार्यालयीन कामकाज तसेच विविध कार्यक्रमांसाठी महाड किंवा पोलादपूर येथे यावे लागते. अशा वेळी त्यांच्यासाठी सुसज्ज विश्रांतीगृह उपलब्ध नसल्यामुळे अडचणींना सामोरे जावे लागते. माजी सैनिकांचे मेळावे, शौर्यदिन, विजयदिन, स्मृतिदिन, मार्गदर्शन शिबिरे, युवकांसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांसाठी स्वतंत्र सभागृहाची नितांत गरज आहे. सध्या अशा कार्यक्रमांसाठी योग्य व सुसज्ज जागेचा अभाव जाणवतो. परिणामी, अनेक उपक्रम इच्छेअभावी नव्हे तर सुविधांच्या अभावामुळे मर्यादित राहतात. महाड-पोलादपूर तालुक्यात सेवानिवृत्त सैनिकांसाठी स्वतंत्र सभागृह व विश्रांतीगृह उभारल्यास ते केवळ सुविधा केंद्र न राहता, देशभक्ती, शौर्य आणि प्रेरणेचे केंद्र बनेल.

याकडे शासन, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी व्यक्त होत आहे. मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याची खंत महाड व पोलादपूरातील ग्रामीण भागात या सेवानिवृत्त सैनिकांना पुढील वारसदारांना सीमा रेषेवर ड्युटीवर असताना संपर्क साधण्यासाठी अनेक यातायात करावी लागते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वाकस, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक प्रथमेश रोहीदास मोरे, अमित ललित जैन, मेधा माधव सुगवेकर यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६४/२ | ००-५१-६० | ४.४४ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक १६ जानेवारी २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे खानाव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील, खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.रविंद्रनाथ गोविंद घरत, रा. खानाव, पो. उसर, ता.अलिबाग, जि. रायगड माझे नावे असलेली भातशेती मिळकतीचा मी श्री. सिद्धेश जीवन लोहार, रा.घर क्र. ३०, वरंडेफाटा चौलमळा, कृष्णादेवी मंदिरजवळ, पो. चौल, ता. अलिबाग-रायगड यांना कायम स्वरुपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबतचा साठेकरार आमच्यामध्ये झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| खानाव ता.अलिबाग | ९/१/ब | ०-५६-१०<br>पो.ख.०-०६-८०<br>एकूण ०-६२-९० | १२.६९ |

वर नमूद भातशेती मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा वा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांची या नोटीशीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यांसह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष व रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरुन मी सदर मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करेन व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे व खरेदीदार यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- १४-०१-२०२६

सही/-
**श्री. रविंद्रनाथ गोविंद घरत,**
रा. खानाव, पो. उसर,
ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा.९०११९३७१३७

## जाहीर सूचना

तमान जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे उसर ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमुद केलेली घर मिळकत श्री. दत्तात्रेय बाळू पाटील यांच्या हक्काची असून, सदर घर व मिळकतीचा असेसमेंट उतारा त्याचेच नावे आहे. सदर मिळकत ही पुर्णपणे विकण्याचा व तिचा उपभोग घेण्याचा अधिकार हा विद्यमान मालक कै. दत्तात्रेय बाळू पाटील यांनी आमचे अशिल सौ. मनिषा राकेश शिंदे यास व तसे अधिकारपत्र दिलेला आहे.

मात्र सदर घर मिळकती समोर मोकळ्या जागेत काही लोक गाळ्याचे अनधिकृत बांधकाम करून सदर गाळे व घर मिळकत विकण्याबाबत तयारी करत आहेत. मात्र सदरचे बांधकाम अनधिकृत असुन सदर मिळकत विकण्या बाबतचे सर्व अधिकार आमचे अशिलांना दिलेले आहेत. तसेच सदर मिळकती बाबत मे दिवाणी कोर्ट अलिबाग येथे दिवाणी दावा प्रलंबित असल्यामुळे सदरच्या मिळकती बाबत कोणीही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, बयाना पावती, करारपत्र करू नये मात्र सदरची नोटीस जाहिर होण्याआधी कोणी लबाडीने सदरच्या मिळकतीबाबत कोणताही करारनामा अथवा अनामत रक्कम घेतलेली असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ चौदा दिवसाचे आत त्यासंबंधी लेखी हरकत खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यनिशी पाठवाव्यात, मात्र मुदती अंती आलेल्या हरकतीचा कोणताही विचार केला जाणार नाही व त्याची संपुर्ण जबाबदारी व्यवहार करणार यांच्यावर राहील व याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**घर मिळकतीचे वर्णन**

| मौजे | मिळकत क्र. | ग्रामपंचायत | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उसर | १३३ | खानाव | ३०X१५ |

अलिबाग
दि. १६/१/२०२६

सही
**ॲड रोशन रविंद्र पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड
मोबाईल नं. ८८३०४५४२१७

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकाना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, १) श्री. रूपेश रविंद्र मांडे २) श्रीमती नीता योगेश जोशी ३) श्रीमती माधुमालिनी मंगेश देशमुख रा. हनुमान मंदीर जवळ दहिगाव, पोस्ट वेणगाव तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. किसन पांडु बांदल २) श्री. काळुराम पांडु बांदल ३) श्रीमती.निराबाई रमेश दुर्गे ४) श्रीमती जागृती जगन उर्फ जगन्नाथ राणे रा. टाकवे तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे टाकवे तालुका कर्जत जिल्हा. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६४ | ८ | ०-०६-३०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकुण क्षेत्र ०-०६-८० | ०.५० |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्भूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिल विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी. मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पुर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दिनांक : १७/०१/२०२६

अशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा. युको बँक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या जमीन मिळकती संदर्भित जमीन मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. प्रभाकर गोपाळ म्हात्रे, २. श्री. अनिल गोपाळ म्हात्रे, ३. सौ. सीमा रमेश जुईकर व ४. श्रीमती प्रतिभा प्रभाकर पाटील यांच्या खुद्द मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीच्या आहेत. सदरील जमीन मिळकतींपैकी श्री. अनिल गोपाळ म्हात्रे यांच्या हिश्श्यांची जमीन मिळकत माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीन मिळकती ह्या पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असून देखील संदर्भित जमिन मिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमुद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीन मिळकतींचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीन मिळकतींचे परिशिष्ट :-**

| अ.क्र. | मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | धोकवडे ता.अलिबाग जि.रायगड | ६४६/१ | ०-५९-१० | १.३१ |
| २. | धोकवडे ता.अलिबाग जि.रायगड | ६४६/२ | १-४२-५० | ३३.०७ |

अलिबाग
दिनांक :- १७-०१-२०२६

**राजेंद्र दा.पाटील**
ॲडव्होकेट
कृष्णनंदन-२ ब्राह्मणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड
मो.९८२२५२८९३१
ईमेल -adv.rdpatil@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकाना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. प्रविण गोविंद वाघमारे रा डोनेवाडी,साळोख तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विदयामन मालक १. लक्ष्मी जयंता केवारी २. तन्वी पंढरीनाथ पारधी अपाक भाऊ परशुराम पंढरीनाथ पारधी ३ परशुराम पंढरीनाथ पारधी ४. लता सचिन पिरकड ५.कुंदा दिनेश भगत रावर्णे, ठाकुरवाडी तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे मिळकतीचे वर्णन

**मौजे पुलाचीवाडी तालुका. कर्जत जिल्हा. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) शेती | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १७ | २/४ | ४-००-०० हे.आर.पॉ.<br>या पैकी लिहून देणार यांच्या अविभक्त हिस्सा ८०-००-०० हे.आर.पॉ. | २.८० |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तद्भूत हक्क हितसंबंधासह . आमचे अशील विकत देण्याचे ठरविले आहे तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान,बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेहि प्रकारचा कायदेशिर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सहि करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळावी मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल खरेदीखताचा करार पुर्ण करतील मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दिनांक : १७/०१/२०२६

अशिला तर्फे ॲडव्होकेट
**ॲड हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गाळा नं १, गणेश अर्पा युको बॅक शेजारी कर्जत ता कर्जत जि. रायगड
८९७६३७५५७०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-दामत ता. कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी खालील यांचेकडून नमूद विद्यमान मालक कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं. | हि. नंबर | क्षेत्र हे.आर.पा. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मोहम्मद जैद समीरुल्लाह चौधरी | ३७ | ४ | ०-४९-७<br>पो.ख. ०-०३-३ | १.५६ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिध्द झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून खरेदी घेणेचे निश्चित करून त्याबाबत करार केला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे झिराड, ता. अलिबाग येथील

| विद्यमान मालकाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र हेक्टर आर चौरस मीटर | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १. श्री. काशिनाथ कृष्णा गुरव<br>२. श्रीमती उर्वशी रोहिदास गुरव<br>३. श्री. चेतन रोहिदास गुरव<br>४. श्री. कल्पेश रोहिदास गुरव<br>५. श्रीमती उज्ज्वला दत्ताराम गुरव<br>६. सौ. स्वरूपा दत्ताराम गुरव<br>७. श्री. आशिष दत्ताराम गुरव<br>८. श्रीमती सुजाता चंद्रकांत गुरव<br>९. श्री. अभिजीत चंद्रकांत गुरव<br>१०. श्री. अमोल चंद्रकांत गुरव<br>११. कु. आश्विनी चंद्रकांत गुरव<br>१२. कु. अपेक्षा चंद्रकांत गुरव<br>१३. सौ. स्मिता दत्ताराम गुरव | १३२ | ०-०९-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण ०-१२-०० | ०.२० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, वहिवाट वा अन्य कोणताही तऱ्हेचा हक्क, वारसाहक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १६/०१/२०२६

सही/-
**ॲड. विराज वसंत पाटील**
राऊत हाऊस दुसरा मजला,
कन्याशाळेसमोर, अलिबाग, रायगड ४०२२०१

दि. १६-०१-२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. तुषार मच्छिंद्र म्हात्रे वगैरे यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधित बोलणी विद्यमान मालक रंजना रविंद्र पाटील व शशिकांत नारायण गावंड यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तळाशेत ता.अलिबाग | ९५/१ | ०-६९-६०<br>पो.ख. ०-१०-४०<br>एकूण ०-८०-०० | ३.१८ |

या मिळकतीपैकी क्षेत्र ०-५३-६० हे.आर.पो.ख.०-१०-४० हे.आर. एकूण ०-६४-०० हे.आर या मिळकतीपैकी रंजना रविंद्र पाटील व शशिकांत नारायण गावंड यांच्या हिश्श्यातील क्षेत्र ०-३२-०० हे.आर ही मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्क्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी, पो. पोयनाड
ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलोशी ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. रविंद्र आत्माराम गावडे, २) सौ. संगिता रविंद्र गावडे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| बेलोशी ता. अलिबाग जि. रायगड | १४९ | ०.७०.४०<br>पो.ख. ०.०९.६०<br>एकूण ०.८०.०० | १६.१८ |

सदरहू मिळकतीपैकी विद्यमान मालकांचे मालकीचे क्षेत्र ०.१६.०० हे.आर. मिळकत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १६/०१/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

अर्जदार तर्फे वकिल
सचिन दि. पाटील

## जाहीर नोटीस

**मुरूड येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात.**

निशाणी नं. ०७/ड
दिवाणी चौकशी अर्ज क्र. ०२/२०२६

१) श्री. प्रविण हरी उर्फ हरीहर कणगी वैगरे .... अर्जदार
विरूद्ध,
कोणीही नाही. .....सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ४ यांची वहिनी कै. सावित्री अरविंद कणगी ही दिनांक ३०/०५/२०२१ रोजी बालाजी हॉस्पिटल मुंबई येथे मयत झाली आहे. विविध सरकारी व निमसरकारी कार्यालयामध्ये कामकाजाचेवेळी मयताचा वारसा दाखला मागितला जात असल्याने अर्जदार नं. १ ते ४ हे कै. सावित्री अरविंद कणगी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळावे म्हणून अर्जदार क्र. १ ते ४ यांनी कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांना अर्जदार क्र. १ ते ४ यांची वहिनी कै. सावित्री अरविंद कणगी यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तींची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दिनांक २०/०२/२०२६ पर्यंत स्वतंत्र किंवा त्यांचे वकीलांमार्फत सदर अर्जाकामी कोर्टामध्ये हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार नं. १ ते ४ यांस त्यांचे मागणीप्रमाणे ते कै. सावित्री अरविंद कणगी यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला 'हेअरशिप सर्टिफिकेट' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवून मे. कोर्टाकडून योग्य ते पुढील आदेश होतील.

आज दिनांक १५/०१/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
**क. लिपीक,**
**दिवाणी न्यायाधिश**
**क. स्तर मुरूड.**

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश**
**क. स्तर मुरूड.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली निवासी सदनिका व त्या सदनिकेचे मालक/कब्जेदारांकडून आमचे अशिल हे कायम स्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहे. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे रोहा, ता. रोहा, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ८५८, क्षेत्रफळ २२६.६ चौ. मी. सत्ताप्रकार- अ, सदर मिळकतीमध्ये आर. सी. सी. मध्ये बांधलेली बिल्डींग मधील सदनिका नं. ०३, पहिला मजला, श्री. चंद्रहार बिल्डींग, मालमत्ता नं. P3CAND000088, ही निवासी सदनिका, क्षेत्र ५५९ चौ. फुट ही निवासी सदनिका या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर निवासी सदनिकेवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तीने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची निवासी सदनिका ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

अलिबाग,
तारीख : /०१/२०२६

**ॲड. सचिन दिनकर पाटील**
बी. ए. एल. एल. बी
मुंबई २१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२२६८७२६९०

## जागा विकणे आहे

वावडुंगी-मुरूड येथील गावठाणाजवळची पिकती शेतजमीन त्यातील घर, बोअरवेल, सर्व्हंट हाऊस व आंबा, पेरू, चिकू, काजू, बांबूच्या बाजत्या झाडांसह विकणे आहे. एकूण क्षेत्र पाच एकर. इच्छुकांनी खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करावा. शिरीष लेले, अलिबाग मो. ७५०७८७९०००

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**मुदतवाढ सूचना**
**ई निविदा सूचना क्र. ६७/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक ३०/१२/२०२५ रोजी दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक कृषीवल, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... नागोठणे व पोयनाड येथील अशुद्ध व शुद्ध जलशुद्धिकरण केंद्रातील ३३५ एचपी व २७० एचपी स्किरल केज इंडक्शन मोटर्सची तातडीची दुरुस्ती करणे. | ₹१५,९६,१५५.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २७/०१/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धीपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येतं की, आमचे अशिलांनी मौजे जांभुळपाडा, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| जांभुळपाडा | ८६ | ०-५९-७०<br>पो.ख. ०-०२-५०<br>०-६२-२० | १४.५० | १) श्री. काशिनाथ कृष्णा पाटील.<br>२) श्रीम. मिनाक्षी मोरेश्वर पाटील<br>३) श्रीम. जनाबाई नारायण पाटील<br>४) सौ. सोनाली राकेश म्हात्रे.<br>५) श्री. दिलीप कृष्णा पाटील<br>६) कु. मोनाली मोरेश्वर पाटील.<br>७) श्री. मऱ्या कृष्णा पाटील.<br>८) श्री. प्रज्वल मोरेश्वर पाटील. |

पैकी वर नमुद मालकांच्या हिश्याच्या ० हे. ३१.७० आर, आकार रु. ७.४६ या क्षेत्रापैकी ० हे. १६ आर एवढे क्षेत्र.

तसेच वर नमुद मालकांच्या हिश्याच्या ० हे. ३१.७० आर, आकार रु. ७.४६ या क्षेत्रापैकी १६ आर क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्रापैकी ६ आर क्षेत्रामधून कायम स्वरुपी वहीवाटीचा रस्ता कराराद्वारे घेण्याचे ठरविले आहे,

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्यांना सदर मिळकतीबाबत वर नमुद केल्याप्रमाणे व्यवहार करण्याचा हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल वर नमुद केल्याप्रमाणे व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १६/१/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे. ठिकाण -सासवणे, संपर्क- +९१९६०७१०२३५७
- प्रा.लि. कंपनीसाठी फ्लॅट, बंगलो भाड्याने व विकत पाहिजे. प्रत्यक्ष मालकांनी फोन करणे. ९८३४९९१२३६
- नवीन बिल्डींग मधील १ BHK फ्लॅट भाड्याने व विकत देणे आहे. मो. ९९२३६०५४४६
- 1st floor ८५० sqft 4 bed२४ तास पाणी, पार्किंग, भाड्याने आणि दोन दुकाने १०x१०(५०००/-महिना भाडे) १०x५ (४०००/-महिना भाडे) भाडेतत्वावर देणे आहे. संपर्क : ९४२३३७७४२२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने - जडित दागिने



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# वनविभागाने रोखली अवैध खैर तस्करी

## • पोलादपूरजवळ ट्रक, मोटारसायकलसह सात लाखांचा मुद्देमाल जप्त




। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर शहरालगत वनविभागाने सापळा रचत गुजरात राज्यातून चिपळूणकडे सुरू असलेली अवैध खैराची वाहतूक उधळून लावली. या धडक कारवाईत खैर लाकडाचा मोठा साठा वाहून नेणारा ट्रक तसेच ट्रकला रस्ता दाखवणारी मोटारसायकल जप्त करण्यात आली असून, दोन्ही वाहनांसह सुमारे सात लाख एक हजार ६६ रुपयांचा मुद्देमाल वनविभागाच्या ताब्यात आला आहे. या कारवाईमुळे चिपळूण हे अवैध खैर तस्करीचे केंद्र असल्याची चर्चा पुन्हा ऐरणीवर आली आहे.

मंगळवार, दि. १३ जानेवारी रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास पोलादपूर वनउपज तपासणी नाक्यावर एक ट्रक (एमएच १२ ईक्यू ९८६६) संशयास्पदरित्या जात असल्याचे वनकर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. तपासादरम्यान ट्रकच्या पुढे यामाहा एफझेड (एचएच ०३ डीडी ६१०९) ही मोटारसायकल पथदर्शक म्हणून चालत असल्याचे स्पष्ट झाले. तात्काळ हालचाल करत वनविभागाच्या पथकाने ट्रक आणि दुचाकी अडवून मोहम्मद अर्शद (रा. गुलशन नगर, दाहेली, जि. बलसाड, गुजरात) व मोहम्मद उस्मान मुबीन खान (रा. जनाबजी चाळ, खिंडीपाडा, मुलुंड कॉलनी, मुंबई) या दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत खैर वृक्षाचे २०१ तुकडे जप्त करण्यात आले असून, त्याचे एकूण मोजमाप ४.७७३ घनमीटर इतके आहे. बाजारभावानुसार या मालाची किंमत सात लाख एक हजार ६६ रुपये असून, ट्रक व दुचाकी दोन्ही वाहनेही जप्त करण्यात आली आहेत.

अवैध खैर वनोपज वाहतुकीप्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत कलम २६ (१) फ, ४१, ४२, ६५ अ नुसार रौ. गु. नं. सी-१२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपींना दि. १४ जानेवारी रोजी महाड येथील न्यायदंडाधिकारी (वर्ग १) यांच्यासमोर हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. प्राथमिक तपासात ट्रकचा मूळ चालक चिपळूणचा रस्ता माहिती नसल्याने त्याला पनवेल येथे उतरवून दुसरा चालक बसवण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे. मात्र, हा खैर साठा चिपळूणमध्ये नेमका कोणाला आणि कुठे पुरवठा होणार होता, याबाबतचा तपास वनविभागाकडून सुरू आहे.

ही यशस्वी कारवाई उपवनसंरक्षक रोहा व सहायक वनसंरक्षक (विकास व कॅम्प) रोहा यांच्या मार्गदर्शनाखाली वनक्षेत्रपाल आशिष पाटील, पोलादपूर वनपाल बाजीराव पवार तसेच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पार पाडली. वनसंपत्तीच्या लुटीविरोधात वनविभागाचा हा कठोर इशारा मानला जात असून, अवैध तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.

# रायगड जिल्ह्यात सर्पदंशाचा धोका

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात सर्पदंशाच्या घटनांमध्ये मागील वर्षभरात लक्षणीय वाढ झाली आहे. अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयाने या रुग्णांना दिलेल्या तत्पर व प्रभावी उपचारांमुळे ४१९ जणांचे प्राण वाचले आहेत. एकूण ४२१ सर्पदंशग्रस्त रुग्ण उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल झाले होते. यापैकी बहुसंख्य रुग्णांवर वेळेवर उपचार झाल्याने ते पूर्णपणे बरे झाले असून, उपचारास उशीर झाल्यामुळे दोन रुग्णांचा मृत्यू झाला, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण, दुर्गम तसेच जंगलालगतच्या भागात सापांचा वावर अधिक आहे. शेतीकाम, घराभोवती वाढलेली झुडपे, रात्रीच्या वेळी अपुरी खबरदारी आणि अंधश्रद्धा यामुळे सर्पदंशाच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालय प्रशासनाने सर्पदंश रुग्णांसाठी विशेष तयारी केली आहे. जिल्हा रुग्णालयात अँटी-स्नेक व्हेनमचा पुरेसा साठा, आवश्यक आपत्कालीन औषधे, तसेच प्रशिक्षित डॉक्टर व परिचारिका २४ तास कार्यरत ठेवण्यात आल्या होत्या.

रुग्ण दाखल होताच तातडीने तपासण्या करून उपचार सुरू करण्यात येत असल्याने गंभीर अवस्थेतील अनेक रुग्णांचे प्राण वाचविणे शक्य झाले. डॉक्टर, परिचारिका आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या समन्वयामुळे सर्पदंश उपचार यशस्वी ठरले असल्याचे प्रशासनाने नमूद केले. दरम्यान, सर्पदंशानंतर पहिल्या काही तासांत उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. वेळेत रुग्णालयात पोहोचलेल्या रुग्णांची प्रकृती लवकर सुधारली, तर उशिरा दाखल झालेल्या काही रुग्णांच्या प्रकृतीत गुंतागुंत निर्माण झाली.

### सर्पदंश रुग्णांसाठी विशेष व्यवस्था

जिल्हा रुग्णालयात सर्पदंश उपचारासाठी अँटी-स्नेक व्हेनम, आपत्कालीन औषधे आणि प्रशिक्षित वैद्यकीय पथक २४ तास उपलब्ध आहे. सर्पदंश झाल्यास उपाय किंवा अंधश्रद्धांवर विश्वास न ठेवता नजीकच्या शासकीय रुग्णालयात जावे. रात्री टॉर्चचा वापर, घराभोवती स्वच्छता, झुडपे काढणे तसेच पायात चप्पल किंवा बूट घालणे यासारख्या खबरदारीच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी माहिती अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांनी दिली.

# मलंग मच्छिंद्रनाथ मुक्त आंदोलनाचे आयोजन

। रसायनी । प्रतिनिधी ।

माघी पौर्णिमाच्या दिवसी श्री मलंग मच्छिंद्रनाथ मुक्ती आंदोलन आंतरराष्ट्रीय बजरंग दल गडावर समाधी मंदिरात महाआरती करून साजरा करण्यात येणार आहे. यावेळी रायगडसह रसायनीतील शेकडो हिंदू बांधव उपस्थित राहणार आहेत.

तरी या आंदोलनात आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक एवं राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश पाटील उपस्थित राहणार आहेत. आंदोलनांत आलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.यावेळी संध्याकाळी ४ वाजता कालिका माता मंदिराच्या पहिले एकत्रीकरण, संध्याकाळी ५ वाजता महाप्रसाद,संध्याकाळी ६.०० वाजता मी मलंग मच्छिंद्रनाथ महाराजांची आरती, संध्याकाळी ६.३० वाजता मार्गदर्शन व सूचना, संध्याकाळी ७.०० वाजता गड चढण्यासाठी सुरूवात, रात्री ८.३० वाजता दुर्गा माता मंदिरात आरती, रात्री ९.०० वाजता समाधी मंदिरात महाआरती, रात्री १२.०० वाजता पालखी दर्शन, रात्री १.०० गड उतरण्यास सुरुवात असे नियोजन असून हिंदुत्ववादी संघटनांनी उपस्थित राहावे असे आवाहन आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांनी केले आहे.

# शालांत परीक्षांचे आठ हजार केंद्र उजळणार

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यात दहावी व बारावीच्या परीक्षा या शासनाच्या दृष्टीने एक आव्हान ठरत असतात. विविध घटकांची मदत घेत या परीक्षा सुरळीत पार पडाव्यात म्हणून राज्य शिक्षण मंडळ प्रयत्नशील असते. त्या पार्श्वभूमीवर राज्य शिक्षण मंडळ व राज्य मुख्याध्यापक महामंडळाची परीक्षा संचालनाबाबत सभा संपन्न झाली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेचे अध्यक्ष डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मुख्याध्यापक मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब आवारी, मंडळाचे सचिव माळी व केरूभाऊ ढोमसे राज्य अध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये अखिल महाराष्ट्र मुख्याध्यापक महामंडळ यांची सभा झाली.

यावर्षी केंद्रावरील केंद्र संचालक,पर्यवेक्षक यांच्या अदलाबदली शाळेबाबत घेतलेला निर्णय मागे घेण्याबाबत सकारात्मक विचार झाला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे.

यासाठी शालेय घटकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. परीक्षक, नियामक यांचे मागील वर्षाच्या सभेमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार मानधनात १५ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१७ नंतर प्रथमच मोठी वाढ राज्य मंडळाने केली . केंद्र संचालक, केंद्रातील कर्मचारी पर्यवेक्षक यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. परीक्षार्थीना पाणी देण्यासाठी मुलांची नियुक्ती करण्याचे ठरले असून वीस रुपये प्रती तासिकेप्रमाणे मानधन देण्याचे ठरले. कस्टडीमधील रनरला केंद्रापर्यंत एक कॉन्स्टेबल किंवा होमगार्ड सोबत देण्याचे ठरले. यावर्षी उत्तर पत्रिका कस्टडी मधून प्रथमच डायरेक्ट पोस्टमन घेऊन जाणार असल्याचे निश्चित झाले. राज्यात ८ हजार ५०० परीक्षा केंद्र आहेत. केंद्र साहित्या साठी १०० ऐवजी २०० रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. एकदा चीफ मॉडरेटर झाल्यानंतर परीक्षक किंवा नियामकाची नियुक्ती देऊ नये, ही बाब मान्य करण्यात आली. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक यांना केंद्र संचालन व इतर कामे असल्याने परीक्षक व नियामकाचे पेपर तपासणीचे कामे देण्यात येऊ नये असे ठरले. अपवादात्मक परिस्थितीत विषयाचे शिक्षक उपलब्ध नसल्यास काम देण्यात येईल.शाळांना कायम मंडळ मान्यता देण्याबाबत विचार करण्यात येऊन ऑनलाईन मंडळ मान्यता देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहेत. शिक्षण संक्रमण मासिका बाबत चर्चा करण्यात आली.

# माथेरान शाळेचा सलग चौथ्या वर्षीही १०० टक्के निकाल



। माथेरान । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासन कला संचालनालय, मुंबई, यांच्या अंतर्गत सप्टेंबर २०२५ मध्ये घेतल्या गेलेल्या शासकीय रेखाकला परीक्षा २०२५ या परीक्षेत प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर, माथेरान या शाळेचा सलग चौथ्या वर्षीही १०० टक्के निकाल लागला.

इयत्ता आठवी ते दहावीचे वर्ग असणाऱ्या या शाळेत केवळ तीन शिक्षक संख्या असूनही शाळेत अनेक उपक्रम आणि विविध स्पर्धांमध्ये शाळेकडून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते.

या वर्षी एलिमेंटरी आणि इंटरमिजीएट चित्रकला ग्रेड परीक्षेसाठी तब्बल ३२ विद्यार्थी संघपाल वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रविष्ट करण्यात आले होते.

प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबई यांच्यामार्फत चित्रकलेच्या एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षा संपूर्ण राज्यात एकाच वेळी घेतल्या जातात.

दरवर्षी प्राचार्य गव्हाणकर विद्यामंदिर मधील शिक्षक संघपाल वाठोरे हे या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून या परीक्षेस प्रविष्ट करतात.

मागील तीन वर्षांचा एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट आपल्या शाळेचा १०० टक्के निकाल आहे. आणि यावर्षीही शाळेचे एकूण ३२ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते.

या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत ग्रेड वाईस ७, ५, आणि ३ याप्रमाणे अतिरिक्त गुण मिळतात.

शंभर टक्के निकाल लागल्याबद्दल संस्थेचे विश्वस्त शशीभूषण गव्हाणकर, मुख्याध्यापक रमेश ढोले आणि पालकांनी अभिनंदन केले आहे.

# समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्ह्यात स्वच्छता मोहिमेचे आयोजन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अभियानाचा एक भाग म्हणून जिल्ह्यातील ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे याठिकाणी शुक्रवारी (दि.१६) सामूहिक स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

स्वच्छता हा मानवी आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. आपल्या घरासह आपल्या आजूबाजूचा परिसरही जर स्वच्छ राहिला तर रोगराईला आळा बसणार आहे. त्यामुळे स्वच्छतेचे महत्त्व लक्षात घेउन समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सामुहिक स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यामध्ये ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील प्लास्टिक, सुका व ओला कचरा गोळा करणे, जमा कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात येणार आहे. या अभियानात तालुका, ग्रामपंचायत स्तरावर अधिकारी, कर्मचाऱ्यांसह मोठ्या संख्येने नागरिकांनीही सहभाग घ्यावा व आपले गावे व परिसर स्वच्छ, सुंदर होतील, यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी केले आहे.

# पद्मदुर्ग किल्ल्यावर सुवर्णदिनाचे आयोजन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

पद्मदुर्ग किल्ल्याला ३५० वर्ष पूर्ण होत असून त्यानिमित्त किल्ल्यात सुवर्ण वर्षे साजरा होणार आहे. या ऐतिहासिक व गौरवशाली सोहळा साजरा करण्यासाठी सर्व इतिहास प्रेमी, दुर्गप्रेमी व नागरिकांनी आपण आपल्या घरातील उत्सव समजून सहकुटुंब १८ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजता पद्मदुर्ग किल्ल्यात उपस्थित राहावे, असे आवाहन पद्मदुर्ग शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन शिवप्रेमी मंच यांनी केला आहे.

यावेळी विशेष उपस्थिती इतिहास अभ्यासक गुरुवर्य आप्पासाहेब परब, सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंह मोहिते, पद्मदुर्ग आरमततार अधिकारी लायजी सरपाटील यांचे वंशज निलेश सरपाटील आदिंसह शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत.

# पाली-खोपोली महामार्गावर गतिरोधक बसविण्याची मागणी

। पाली । प्रतिनिधी ।

पाली- खोपोली- वाकण महामार्गावर सातत्याने घडणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

या धोकादायक महामार्गावर अनेक गंभीर अपघात घडून नागरिकांचे बळी गेले असून, काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा पँथर सेनेने दिला आहे.

या मागणीसंदर्भात रायगड जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पँथर सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार यांना निवेदन सादर केले. या निवेदनाची प्रत रायगड जिल्हाधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळालाही पाठविण्यात आली आहे. यावेळी सुधागड तालुकाध्यक्ष मारुती गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सेवक जाधव, आकाश कांबळे आणि निशांत पवार उपस्थित होते.

काही वर्षांपूर्वी पाली-खोपोली-वाकण महामार्गाचे नूतनीकरण करण्यात आले असून, पाली ते खोपोली या टप्प्यावर काँक्रिटीकरण झाले आहे. रस्त्यावरील वळणे व चढ-उतार कमी झाल्यामुळे वाहनांची वेगमर्यादा वाढली आहे.

परिणामी या मार्गावर अपघातांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. विशेषतः गावांच्या हद्दीत, शाळा, बाजारपेठा व वर्दळीच्या ठिकाणी वेगावर कोणतेही नियंत्रण नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या पार्श्वभूमीवर अपघातांना आळा घालण्यासाठी अपघातप्रवण क्षेत्रांमध्ये गतिरोधक बसविणे, वेगमर्यादा दर्शविणारे सूचना फलक उभारणे आणि आवश्यक ठिकाणी सुरक्षात्मक उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याचे पँथर सेनेने निवेदनात नमूद केले आहे.

## ठेकेदाराने केले निकृष्ट दर्जाचे काम | जलवाहिन्या फुटल्यामुळे नागरिक त्रस्त

# श्रीवर्धनमध्ये जलवाहिन्या बदलण्याची गरज

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

दोन वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगर परिषदेकडून श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानवली पाझर तलावापासून श्रीवर्धन शहरापर्यंत नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम करण्यात आले. त्याचप्रमाणे रानवली पाझर तलाव या ठिकाणी नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला.

कोल्हापूर येथील रविराज इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने सदर जलशुद्धीकरण प्रकल्प निर्माणाचे व जलवाहिन्या बदलण्याचे काम केले आहे. मात्र या जलवाहिन्या बदलण्याच्या कामामध्ये जलवाहिन्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या वापरल्यामुळे जेव्हापासून हे काम पूर्ण झाले आहे तेव्हापासून नियमितपणे जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार घडत आहेत.

या कामाचा लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे व मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत मोठा गाजावाजा करून करण्यात आला होता. परंतु जलवाहिन्या बदलण्याचे काम सुरू असताना त्यावरती श्रीवर्धन नगरपरिषदेकडून तज्ञ व्यक्तीची नेमणूक होणे गरजेचे असताना, केवळ ठेकेदाराच्या सोयीप्रमाणे काम करून घेण्यात आल्याने काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. रानवली पाझर तलाव ते श्रीवर्धन या मार्गावरती रोज कुठे ना कुठेतरी जलवाहिनी फुटण्याचे प्रकार घडतात व पाझर तलावातील लाखो लिटर पाणी वाया जात आहे.

श्रीवर्धनच्या नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे या हेतूने जलशुद्धीकरण प्रकल्पाची उभारणी करण्यात आली. परंतु जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सुद्धा श्रीवर्धन शहरातील नागरिकांना अनेक वेळा गढूळ पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे जलशुद्धीकरण प्रकल्पामध्ये नक्कीच शुद्धीकरण होते की दूषितिकरण होते. असा प्रश्न नागरिकांना पडलेला पाहायला मिळतो. गेल्या अनेक दिवसांपासून श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये कायमस्वरूपी मुख्याधिकारी नेमणूक करण्यात आलेली नाही. सतत कोणत्या ना कोणत्यातरी अन्य नगर परिषदेच्या किंवा नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांकडे श्रीवर्धन नगरपरिषदेचा कार्यभार सोपवण्यात येतो. पर्यायाने फिरत्या रंगमंचा प्रमाणे श्रीवर्धन नगरपरिषदेच्या कामगारावर याचा गंभीर परिणाम झालेला दिसून येतो. पाणी वेळेवर येत नसल्यामुळे श्रीवर्धन मधील नागरिकांना नेहमीच मनस्ताप सहन करावा लागतो. तज्ञ अभियंत्यांची नेमणूक करून झालेल्या कामाचे ऑडिट करावे. अशी मागणी केली जात आहे.

> "श्रीवर्धनला पाणीपुरवठा करणाऱ्या पाझर तलावापासून जलवाहिन्या फुटण्याचे प्रकार घडत आहेत हे मान्य आहे. शहरातील काही भागांमध्ये पाणीपुरवठा त्यामुळे होत नाही. त्यासाठी एक ठराविक प्रेशरने पाणी सोडावेच लागते. यासाठी आमचे अभियंते प्रयत्न करत आहेत
> -विठ्ठल राठोड, मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद."

# निवडक



## जिल्हा रुग्णालयात रजोनिवृत्ती क्लिनिकचा शुभारंभ

**रायगड** : वयाच्या चाळीशीनंतर महिलांच्या आयुष्यात येणारा रजोनिवृत्तीचा टप्पा अनेक शारीरिक आणि मानसिक आव्हाने घेऊन येतो. या संवेदनशील काळात महिलांना योग्य उपचार, समुपदेशन आणि मार्गदर्शन मिळावे, यासाठी जिल्हा रुग्णालयात रजोनिवृत्ती क्लिनिकचा शुभारंभ करण्यात आला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेले हे क्लिनिक ४० ते ५५ वयोगटातील महिलांसाठी मकर संक्रांतीचे आरोग्यदायी वाण ठरले आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांच्या उपस्थितीत या विशेष उपक्रमाचे उद्घाटन झाले. या क्लिनिकच्या माध्यमातून महिलांना मोफत तपासणी, औषधोपचार तसेच मानसिक समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यावेळी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. भोपाळे यांनी रजोनिवृत्तीदरम्यान होणारे हार्मोनल बदल, हाडांचा ठिसूळपणा, उष्णतेचे झटके आणि थकवा यासारख्या त्रासांबाबत सविस्तर माहिती दिली. तर, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अर्चना सिंग यांनी या काळात महिलांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. दर बुधवारी हे रजोनिवृत्ती क्लिनिक महिलांच्या सेवेसाठी खुले राहणार आहे.



## एमआयडीसीतील रस्त्यांची दुरवस्था

**वावोशी** : खालापूर व पनवेल तालुक्याच्या हद्दीत असलेल्या रसायनी पाताळगंगा एमआयडीसी परिसरातील सिप्ला, कैरे कॉर्नर तसेच रिलायन्स, कॅस्ट्रॉल, बिगकोला आदी नामांकित कंपन्यांच्या समोरून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबर, निखळलेले प्लेवर ब्लॉक आणि अपुऱ्या सुरक्षित व्यवस्थेमुळे नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. हा महत्त्वाचा मार्ग सावरोली ते पाताळगंगा एमआयडीसीला जोडणारा असल्याने या रस्त्यावरून दररोज हजारो कामगार, विद्यार्थी, स्थानिक नागरिक तसेच अवजड वाहनांची वर्दळ असते. मात्र रस्त्यांची झालेली दुरवस्था पाहता येथे कधीही मोठा अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. रस्त्यांवर योग्य सूचना फलक नाहीत, वेगमर्यादा दर्शविणारे बोर्ड लावण्यात आलेले नाहीत, तर अनेक ठिकाणी असलेले स्पीड ब्रेकर इतके खराब झाले आहेत की ते नसल्यासारखेच भासतात. काही ठिकाणी स्पीड ब्रेकरच नसल्याने वाहनांचा वेग वाढून अपघातांना निमंत्रण मिळत आहे. या परिसरातून मोठ्या प्रमाणात लहान मुले, शाळकरी विद्यार्थी व औद्योगिक कामगार प्रवास करत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.



## शैक्षणिक साहित्य वाटप

**माणगाव** : माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर क्रिकेट संघटना, महाड यांच्या वतीने गुरुवारी (दि. १५) जानेवारी रोजी माध्यमिक विद्यामंदिर, रातवड विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात प्रोत्साहन देणे व त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे हा होता. कार्यक्रमप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम तसेच विद्यालयातील शिक्षकवृंद उपस्थित होते. कदम यांनी संघटनेच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी या संधीचा योग्य उपयोग करून अभ्यासात सातत्य ठेवावे, असे आवाहन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संघटनेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.




रंगबहार

शरद कोरडे

# मराठी बाण्याची खंबीर अभिनेत्री

# नंदा

**चित्रित झालेले भैय्या मेरी छोटी बहन को ना भुलाना हे गाणे खूप गाजले होते. या चित्रपटांतील भूमिकेसाठी नंदाला फिल्मफेअर अवॉर्ड साठी सहाय्यक भूमिकेचे नामांकन झाले होते, पण प्रत्यक्षात ते नंदाला मिळाले नाही यावर नंदाने जाहीरपणे फिल्मफेअर अवार्ड कसे मॅनेज केले जातात यावर भाष्य केले होते. त्यापूर्वी फिल्मफेवर अवॉर्डवर टीका करण्याचे धैर्य कुठल्याही कलाकारांनी केले नव्हते.**

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत मराठी बाण्याचा झेंडा फडकविणारी, मास्टर विनायक यांची कन्या नंदा हिचा स्मृतिदिन आठ जानेवारीला नुकताच झाला .राजेंद्रकुमार राजकपूर पासून शशी कपूर पर्यंत व धर्मेंद्र पासून राजेश खन्ना पर्यंतच्या नामवंत अभिनेत्यांसोबत काम करण्याची संधी नंदाला मिळाली. १९४८ सालच्या मंदिर पासून बी. आर. चोप्रा यांच्या मजदूर पर्यंत त्यांनी अनेक हिंदी चित्रपटात भूमिका केल्या. तीन दशके त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवले.

नंदा हिचा जन्म ८ जानेवारी १९४१ रोजी कोल्हापूर येथे कर्नाटकी घराण्यात झाला. वडील विनायक दामोदर कर्नाटकी उर्फ मास्टर विनायक हे त्यावेळी मराठी चित्रपटांतील नामवंत नायक, दिग्दर्शक व निर्माते होते. मास्टर विनायक यांनी १९३२ मध्ये अयोध्येचा राजा या प्रभातच्या चित्रपटात नारदाचे काम करून आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात केली. प्रभात कंपनी पुण्यात गेल्यानंतर त्यांनी 'कोल्हापूर सिनेटोन' या कंपनीत प्रवेश केला. विलाशी ईश्वर या १९३५ सालच्या मामा वरेरकर लिखित चित्रपटाचे दिग्दर्शन करण्याची प्रथम संधी त्यांना मिळाली. पुढे बाबुराव पेंढारकर, पांडुरंग नाईक व मा.विनायक यांनी 'हंस पिक्चर'ची स्थापना केली. त्यांनी ज्वाला, छाया, ब्रह्मचारी, ब्रांडीची बाटली आदी चित्रपटांचे दिग्दर्शन केले व त्यात नायकाच्या भूमिका ही केल्या. त्यानंतर हंस पिक्चर ही चित्रसंस्था बंद करून ते मुंबईला आले. १९४३ साली त्यांनी प्रफुल्ल पिक्चर्स ही संस्था स्थापन केली. नटश्रेष्ठ मा.दिनानाथ मंगेशकर यांच्या कुटुंबाशी त्यांचा दाट स्नेह असल्याने त्यांच्या पश्चात त्यांनी लता मंगेशकर यांचे अभिनय व गायन गुण हेरून त्यांना आपल्या सोबत मुंबईला आणले.
त्यांच्या पहिली मंगळागौर या १९४२ सालच्या चित्रपटातही लता मंगेशकर यांनी काम केले. मंदिर हा चित्रपट भूमरड्डी प्रॉडक्शन तर्फे १९४८ साली तयार करण्यात आला होता. त्यामध्ये मास्टर विनायक, शाहू मोडक, शांता आपटे यांनी भूमिका केल्या होत्या. या चित्रपटाचे दिग्दर्शन मास्टर विनायक यांनीच केले होते. संगीत वसंत देसाईंचे होते. या चित्रपटात लता मंगेशकर यांच्या धाकट्या भावाचे काम बेबी नंदाने केले होते. हा नंदाचा पहिला चित्रपट तर लता मंगेशकर यांनी काम केलेला शेवटचा चित्रपट होता. यानंतर लतादीदींनी अभिनय सोडून गायनावर लक्ष केंद्रित केले व पुढे इतिहास घडविला .मंदिर चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच वयाच्या ४१ व्या वर्षी मास्टर दिनानाथ यांचा मृत्यू झाला. त्यावेळी ते दादरला शिवाजी पार्क येथील आशीर्वाद बंगल्यात राहत होते. नंदा त्यावेळी आयडियल हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होती. वडिलांना चित्रपट निर्मितीमध्ये कर्ज झाल्याने घरची परिस्थिती बेताची होती. नंदाला बालकलाकार म्हणून चित्रपटांतून कामे मिळत असल्याने घरच्या चरितार्थाला प्रश्न सुटला होता, पण शाळेत जाऊन शिक्षण घेणे अवघड जात होते. त्यामुळे तिला घरी शिक्षक बोलावून शिक्षण घ्यावे लागले. स्कूल टीचर व बॉम्बे स्काऊट कमिशनर गोकुळदास माखी यांनी तिला घरी येऊन शिक्षण दिले. घरातील सहा भावंडांचे शिक्षण मात्र नंदाने आपल्या चित्रपटांच्या कमाईतून रीतसर विद्यालयात पाठवून केले. त्यांचा एक भाऊ जयप्रकाश कर्नाटकी हा पुढे सिने दिग्दर्शक झाला. त्याने जयश्री टी. हिच्याबरोबर विवाह केला. नंदाने पुढे जग्गू, शंकराचार्य, अंगारे, जगद्गुरु, आदी चित्रपटांतून तसेच पहिली मंगळागौर, कुलदैवत, शेवग्याच्या शेंगा, देव जागा आहे, झाले गेले विसरून जा, माते विना बाळ, या मराठी चित्रपटांतूनही कामे केली.

चित्र महर्षी भालजी पेंढारकर व बाबुराव पेंढारकर हे जवळचे नातेवाईक असल्याने त्यांनी नंदाला व तिच्या कुटुंबाला खूप मदत केली. व्ही. शांताराम हे नंदाचे मामा वशीचे यजमान असल्याने त्यांनी त्यांच्या राजकमल कला मंदिर तर्फे तयार होणाऱ्या तुफान और दिया या चित्रपटात नंदाला प्रथमच नायिकेची भूमिका दिली. तिचा नायक राजेंद्र कुमार होता. या चित्रपटाचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांचे ज्येष्ठ पुत्र प्रभात कुमार यांनी केले होते.त्यांनी दिग्दर्शित केलेला हा एकमेव चित्रपट.या चित्रपटाचे कथा मोठी बहीण व धाकटा भाऊ यांच्या भावनिक नातेसंबंधावर आधारित होती. आई-वडिलांच्या मृत्यू पश्चात धाकटा भाऊ आपल्या मोठ्या बहिणीची जबाबदारी स्वतःवर घेतो व तिच्या विवाहासाठी लहान वयात



पराकोटीचे कष्ट करतो. मंदिराचे पुजारी त्याला सहाय्य करत असतात. सतीश व्यास व नंदा यांनी बहिणभावाच्या भूमिकांसाठी रसिकांची मने जिंकली. हा चित्रपट यशस्वी झाला व नंदाला नायिका म्हणून मान्यता मिळाली. यानंतर नंदाला शतरंज १९५६ ,बंदी एकाच वर्षी मिळाले. दाक्षिणात्य निर्माते ए.व्ही.एम .यांच्या कृष्णन पंजू दिग्दर्शित गाजलेला चित्रपट भाभी मिळाला. या चित्रपटात बलराज सहानी, पंढरीबाई, ओमप्रकाश, दुर्गा खोटे यांच्यासह बहिणीच्या भूमिकेत नंदा होती. भाभी चित्रपटांसाठी राजेंद्र कृष्ण यांनी गीते लिहिली व चित्रगुप्त यांनी त्याला संगीत दिले. यांतील सर्वच गाणी खूप गाजली. महंमद रफी यांनी गायलेले चल उड जा रे पंछी हे गीत खूप लोकप्रिय झाले होते. त्यानंतर १९५९ च्या एल. व्ही. प्रसाद यांच्या छोटी बहन या चित्रपटातील टायटल रोल नंदाला मिळाला. या चित्रपटात बलराज सहानी, रेहमान,राजा गोसावी, दुर्गा खोटे, मेहमूद, शुभा खोटे व धुमाळ यांच्या भूमिका होत्या. रेहमान यांच्या छोट्या बहिणीचे काम नंदाने केले. तिच्यावर चित्रित झालेले भैय्या मेरी छोटी बहन को ना भुलाना हे गाणे खूप गाजले होते. या चित्रपटांतील भूमिकेसाठी नंदाला फिल्मफेअर अवॉर्ड साठी सहाय्यक भूमिकेचे नामांकन झाले होते, पण प्रत्यक्षात ते नंदाला मिळाले नाही यावर नंदाने जाहीरपणे फिल्मफेअर अवार्ड कसे मॅनेज केले जातात यावर भाष्य केले होते. त्यापूर्वी फिल्मफेवर अवॉर्डवर टीका करण्याचे धैर्य कुठल्याही कलाकारांनी केले नव्हते. निर्माते वसंत जोगळेकर यांच्या १९६० च्या आंचल या चित्रपटाने नंदाला चित्रपटाची नायिका असतानाही सहायक भूमिकेचे फिल्म फेवर अवॉर्ड मिळवून दिले. या चित्रपटाचे दिग्दर्शनही वसंत जोगळेकर यांनी केले होते. यांत अशोक कुमार, नंदा, ललिता पवार व निरुपा रॉय यांनी भूमिका केल्या होत्या. नंदाला मिळालेला हा एकमेव फिल्मफेअर पुरस्कार. तसे नंदाचे भाभी, इत्तेफाक, आहिस्ता आहिस्ता, प्रेम रोग या चित्रपटातील भूमिकांसाठी नामांकन झाले होते. नंदाने पुढे आग्रा रोड १९५७, लक्ष्मी साक्षी १९५७, दुल्हन १९५८, बरखा, जरा बचके, कैदी नंबर ९११ आदी चित्रपट केल्यानंतर बी. आर. चोप्रा यांच्या १९५९ सालच्या धुल का फुल मध्ये राजेंद्र कुमार बरोबर दुसऱ्या नायिकेचे काम नंदाने केले, या चित्रपटात राजेंद्र कुमार, माला सिन्हा, मनमोहन कृष्ण, लीला चिटणीस, अशोक कुमार व जीवन हे कलाकार होते. या चित्रपटाचे गीते साहिर लुधियानवी यांनी लिहिली होती तर एन. दत्ता यांनी संगीत दिले होते . त्यानंतर नंदाने देवानंद सोबत काला बाजार १९६०, हम दोनो १९६१ व तीन देवीया या चित्रपटात काम केले. राज कपूर सोबत आशिक १९६२, शशी कपूर सोबत नंदाने चार दिवारे १९६१, राजा साहब, निंद हमारी ख्याब तुम्हारे व रुठा ना करो, हे चित्रपट केले, परंतु त्यावेळी शशी कपूरचा एकही चित्रपट हिट झाला नसल्याने त्याच्यावर अनलकी स्टार म्हणून शिक्का बसला होता व नामवंत नायिका शशी कपूर सोबत काम करण्यास नकार देत असत. अशावेळी नंदाने शशी कपूर सोबत अनेक चित्रपटात कामे केली व अखेर १९६५ चा जब जब फुल खिले हा चित्रपट हिट झाला व शशी कपूर यशस्वी नायक ठरला. जब जब फुल खिले चे काश्मीरमधील चित्रीकरण दाल लेक मधील शिकाऱ्यांतील सीन, कल्याणजी आनंदजी यांच्या संगीताने नटलेली सुमधुर गाणी, शशी कपूर व नंदा यांची उत्कृष्ट कामे, यामुळे जब जब फुल खिले तुफान यशस्वी झाला होता. त्याही पुढची घटना म्हणजे या चित्रपटाचे दिग्दर्शक सुरज प्रकाश यांनी आपल्या मराठमोळ्या नायिकेच्या सौंदर्यावर लोक लुप्त होऊन तिला लग्नाची मागणी घातली होती परंतु नंदा ने नकार दिला. नंदा शेवटपर्यंत अविवाहित राहिली. नंदाचे भाऊ व मैत्रीण वहिदा रेहमान यांनी तिच्यासाठी अनेक स्थळे पाहिली पण नंदाने त्यांनाही नकार दिला. शेवटी उत्तर आयुष्यात नंदाने निर्माता मनमोहन देसाई यांच्याबरोबर लग्न करण्याचे ठरविले. त्यांचा साखरपुडाही झाला परंतु त्यानंतर देसाई यांचा त्यांच्या इमारतीच्या टेरेसवरून पडून मृत्यू झाला व नंदाचे ते स्वप्नही भंगले.

चित्रपटांत नाईकांमध्ये यशस्वी होण्यासाठी प्रचंड स्पर्धा असते व आपापसात छुपे वैरही असते. अशांतही नंदा व वहिदा रेहमान, आशा पारेख, साधना ,हेलन यांची निखळ मैत्री होती. आपल्या धडपडीच्या आयुष्यात वेळ ठरवून त्या एकत्र भेटत असत व एक दिवस मनसोक्त गप्पा मारून मजा करत असत. देवानंद च्या कालाबाजार पासून नंदाची व वहिदा रहमान यांची मैत्री झाली होती, तर हम दोनो पासून साधनाशी तिचे सूत जमले होते. त्यात आशा पारेख व हेलन यांचीही भर पडली व अखेरपर्यंत त्यांची मैत्री टिकली. रुपेरी पडद्यावरील निकोप मैत्रीचे हे एकमेव उदाहरण असेल.

नंदाने राजेंद्र कुमार बरोबर कानून, धूल का फुल व तुफान और दिया, या चित्रपटात काम केले, तर शशी कपूर सोबत चार दिवारे, मेहंदी लगी मेरे हाथ, जब जब फुल खिले, रुठा ना करो, नींद हमारी ख्याब तुम्हारे, राजा साब, व मोहब्बत इसको कहते है, या चित्रपटांतून कामे केली. धर्मेंद्र सोबत आकाशदीप व मेरा कसूर क्या है, राज कपूर सोबत आशिक, या चित्रपटात काम केले. जितेंद्र सोबत परिवार, धरती कहे पुकार के, व बडी दीदी. तर देवानंद सोबत हम दोनो, कालाबाजार, तीन देवीयाँ व मनोज कुमार सोबत गुमनाम, व शोर या चित्रपटातून कामे केली. नंदा यांनी यांनी मनमोहन देसाई यांच्या मृत्यूनंतर खूप काळ बाहेरील कार्यक्रमांना न जाता एकाकीपणे स्वतःला समाजापासून दूर ठेवले होते. मात्र मराठी चित्रपट 'नटरंग' पाहण्यासाठी त्या वहिदा रेहमान सह त्या चित्रपटगृहात गेल्या होत्या. चित्रपटाचा आनंद घेऊन त्यांनी दिग्दर्शक व कलाकारांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. २५ मार्च २०१४ रोजी त्यांना त्यांच्या वर्सोवा येथील निवासस्थानात हृदयविकाराचा झटका आला व त्यानंतर त्यांची प्राणज्योत मालवली. नंदा या मराठमोळ्या अभिनेत्रीने प्रतिकूल परिस्थितीशी झगडून हे यश संपादन केले होते, त्यांच्या या दिर्घ तपस्येस व एकाकी खंबीर लढतीस सलाम!!

**

# महापालिका निवडणुकीतही पुन्हा तोच गोंधळ!



जगन घाणेकर

राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान यंदा गोंधळातच पार पडले. तब्बल ८ वर्षानंतर निवडणूक लागल्याने यंदा मुंबई-ठाणे वगळता मतदारांमध्ये कमालीचा उत्साह होता. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले. मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते. महापालिका वार्डांच्या पुनर्रचनेमुळे कितीतरी मतदारांची नावे विभागली गेली. ज्यामुळे मतदारांना आपली नावे शोधण्यासाठी एका मतदान केंद्रावरून दुसऱ्या मतदान केंद्रावर फेऱ्या माराव्या लागत होत्या. कित्येक मतदारांची नावे मतदार याद्यांमधून गायब झाली होती. ममुंबईतील घर भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये राजकीय पक्षांच्या बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी विधानसभा निवडणुकीलां मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे? विधानसभा निवडणुका झाल्यानंतर महापालिकेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता. या काळात याद्या अद्यावत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला. शहरात दरवेळी मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत असते. यंदा सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही ठिकाणी अर्धा अर्धा तास कमी केल्याचे अनेकांना ज्ञात नव्हते त्यामुळे मतदान करून सकाळी लवकर कामावर जाणाऱ्यांसह नागरिकांना मतदान केंद्रांवर सकाळी अर्धा तास विनाकारण तिष्ठत राहावे लागले. आपल्या जिल्ह्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही. नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात. केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या महापालिका निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

# प्रदिप पटवर्धन एक हरहुन्नरी कलावंत

श्रीराम शेटये

मोरूची मावशी म्हटलं की विजय चव्हाण यांच्यासोबत अगदी पहिले नाव येते ते प्रदिप पटवर्धन यांचे.

मराठी सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते प्रदीप पटवर्धन यांनी आतापर्यंत अनेक मराठी नाटक, चित्रपट आणि मालिकांमध्ये उल्लेखनीय भूमिका साकारल्या होत्या. त्यांच्या हरहुन्नरी अभिनयाने 'मोरुची मावशी' या नाटकातील 'भैया पाटील' ही त्यांची भूमिका गाजली होती.

दिलखुलास व्यक्तिमत्व, प्रभावी अभिनय, आणि लक्षवेधी संवादफेक यामुळे कायम प्रेक्षकांच्या मनात घर केलेल्या प्रदीप पटवर्धन हे नाव नाटक, मालिका आणि चित्रपटसृष्टीत मोठ्या आदराने घेतले जात असे. मात्र या हरहुन्नरी कलावंतांची दखल जरा उशीरानेच घेतली गेली. त्यांचा जन्म १ जानेवारी १९५८ मुंबईत झाला. मूळचा कोकणातील दापोलीजवळील अंजरळे येथील असलेल्या पोलीस कमिशनर ऑफिसला असणाऱ्या हेडक्लार्क वडील व म्युनिसिपालिटीच्या शाळेत संगीत शिक्षिका असलेल्या आई या पटवर्धन कुटुंबात दुसरा मुलगा म्हणून प्रदीपचा जन्म झाला. म्युनिसिपालिटीतर्फे होणाऱ्या नाटकातून काम करणाऱ्या आईकडून प्रदीपला अभिनयाचा वारसा मिळाला होता. पोलीस खात्यात असलेल्या वडीलांची करडी शिस्त व शिक्षिका आईच्या प्रेमळ सहवासात प्रदीपचे लहानपण आनंदात गेले. शालेय जीवनात अत्यंत हुशार असणाऱ्या प्रदीपने पहिली ते सातवी पहिला दुसरा क्रमांक मिळविला. मात्र त्यानंतर नृत्याची आवड वाढल्याने अभ्यासाकडे काहीसे दुर्लक्ष झाले ते थेट त्याकाळातील जुन्या अकरावीमध्ये दोन वर्ष मुक्काम करण्यापर्यंत झाले.

लहानपणी गिरगावातील गणपती मिरवणूक व गोविंदा पथकातून उत्तम नाचणारा तरुण म्हणून प्रदीपला पहिल्यांदा ओळख मिळाली. महाविद्यालयीन शिक्षण सिध्दार्थ कॉलेजमधून घेतांना त्याने सतीश पुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांतून सहभाग घेण्यास सुरुवात केली. अभिनय व अभ्यास अश्या दोन्ही बाजू सांभाळत एकांकिका स्पर्धातून सातत्याने पारितोषिक मिळविण्याचा जणू त्याला छंदच लागला. या काळात २० - २२ सर्वोत्कृष्ट अभिनेत्याची पारितोषिके त्याने पटकावलीत. बी.कॉम.ची पदवी घेतल्यानंतर मात्र योग्य वयात नोकरी मिळणे त्या काळात आवश्यक समजले जात होते. त्यामुळे सुरुवातीला पारितोषिके मिळाल्यानंतर कौतुक करणारे घरचे साहजिक नाटक बंद करुन, नोकरी कर म्हणून मागे लागले. अखेरीस ओबेरॉय हॉटेलमध्ये ग्लास विसळण्याची स्टुअर्डची नोकरी पकडली नंतर सोसायटीमध्ये विविध सामान पोहचविणाऱ्या सेल्सबॉयची नोकरी, रिझर्व्ह बँकेत २५ रुपये रोजाने काम करत आंतरबँक एकांकिका स्पर्धातूनही काम केले. टेंम्पल एम्प्लॉईमेंट ही भरत तांडेल यांनी दिग्दर्शित एकांकिकेला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचे पारितोषिक मिळाले. याबद्दल बँकेने सत्कार केला आणि नोकरीचा नारळ हातात दिला. नंतर एका वकिलाकडे टायपिस्ट म्हणून नंतर सचिवालयात टायपिस्ट म्हणून नोकरी केली पण कायम स्वरुपी नोकरी काही मिळत नव्हती. शेवटी घरच्यांनी या वर्षात नोकरी मिळाली नाही तर सरळ बोरिवलीला रिक्षा चालवायची असा दमच दिला.

कायम नोकरी मिळवायला साथ मिळाली ती ही अभिनयाची. राज्य नाट्य स्पर्धेत माझी पहिली चोरी या नाटकाचा रविंद्र नाट्य मंदिरातील प्रयोग पहायला अमोल पालेकर आले होते. प्रदीप यांचे मित्र पावस्कर यांच्या ओळखीचे बँक ऑफ इंडियातील पाठारे यांनी अमोल पालेकरांचे पत्र आणल्यास तुला नोकरी मिळू शकेल असे सांगितले. अमोल पालेकरांचे पत्र मिळाल्यानंतर १७ जून १९८३ ला बँक ऑफ इंडियामध्ये नोकरी लागली. नोकरी लागल्याची बातमी घरी दिल्यावर आनंदित झालेल्या आईने आता नोकरी सोडायची नाही अन् नाटकही सोडायचे नाही असे सांगितले. आईने सांगितलेले प्रदीप यांनी मनावर घेतले आणि नाटक करत नावारुपाला आल्यानंतरही त्यांनी बँकेतील नोकरी सोडली नाही.



नाट्यसृष्टीत या गच्ची आपलीच आहे या व्यावसायिक नाटकाने सुरुवात झाली आणि १ जानेवारी १९८५ ला प्रदीप यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे व्यावसायिक नाटक त्यांना मिळाले ते म्हणजे सुयोगचे मोरुची मावशी. मराठी रंगभूमीवर अनेक दशके हाऊस फूल्लचा बोर्ड मिरवणाऱ्या 'मोरुची मावशी' या नाटकातली पटवर्धन यांची भूमिकाही खूप गाजली होती. या नाटकाचे तब्बल दीड हजारांहून अधिक प्रयोग त्यांनी केले. पाचशे प्रयोगानंतर प्रशांत दामले सुयोगच्या ब्रह्मचारी नाटकात काम करणे सुरु केल्यानंतर मोरुची मावशी सोडले पण त्यानंतर जवळपास ९ मोरुंसोबत प्रदीप यांनी काम केले.

१९९० मध्ये मोरुच्या मावशीचे १५०० प्रयोग झाल्यानंतर मृच्छकटिकम् या संस्कृत मालिकेच्या चित्रीकरणादरम्यान शर्विलकाच्या भूमिकेत उंचावरुन उडी मारण्याच्या प्रसंगात पायाचा घोटा दुखावल्याने, दीड वर्षे घरी बसावे लागले. त्यामुळे नाईलाजाने मोरुची मावशी नाटक सुटले. पुन्हा काम सुरु केल्यावर व्यावसायिक नाटकातून बायको असून शेजारी, चल काहीतरीच काय, भटाला दिली ओसरी, तुझं आहे मजपाशी, दिली सुपारी बायकोची, सखी प्रिय सखी, बायकोची खंत, अशी बायको हवी, लग्नाची बेडी, बायांनो नवरे सांभाळा, शिरला तोच तरला, बुवा तेथे बाया, पेईंग गेस्ट, टू इज कंपनी, लेले विरुध्द लेले आदी अनेक नाटकांमधून त्यांनी रंगभूमीची सेवा व रसिक प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. या नाटकांच्या नावाचे वैशिष्ट्य म्हणजे शीर्षकामध्ये बायको हा शब्द असलेल्या नाटकांची संख्या अधिक आहे.

दूरचित्रवाणीमालिकांमध्ये सर्कस प्रेमाची या शैलेश प्रभावळकर यांच्या मालिकेतून छोट्या पडद्यावर त्यांचे पदार्पण झाले. त्यानंतर आवड आपली आपली, थोरला हो, बोट लावीन तिथं हा हा हा, कोपरखळी, समांतर, ग्रीड इंटरपोल, मुंबई पोलीस, कॉमेडी एक्स्प्रेस या मालिका केल्या पण या क्षेत्रात ते जास्त रमले नाहीत. चतुरस्त्र अभिनेता अशी ओळख झाल्यानंतर त्यांना चित्रपटसृष्टीतूनही बोलावणे आले. गोविंदराव कुलकर्णी यांच्या अंगार चित्रपटातून त्यांनी रुपेरी पडद्यावर पदार्पण केले. लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत जमलं हो जमलं, त्यानंतर एक फुल चार हाफ, सुखी संसाराची बारा सूत्रे, नवरा माझा नवसाचा, चश्मे बहाद्दर, एक दोन तीन चार, लावू का लाथ, भुताळलेला, तिघी, टकाटक, गरम मसाला, करायला गेलो एक, नवरा माझा भवरा, डोम, मी शिवाजी राजे भोसले बोलतोय, एक शोध अशा अनेक लोकप्रिय मराठी चित्रपटांमध्ये प्रदीप पटवर्धन यांनी आपला ठसा उमटवला. याशिवाय त्यांनी होल्डिंग बॅक (२०१५), मेनका उर्वशी (२०१९), थँक यू विठ्ठला (२००७), वन टू थ्री फोर (२०१६) आणि पोलीस लाईन : एक पूर्ण सत्य (२०१६) यासारख्या चित्रपटांची निर्मितीही त्यांनी केली होती.

मराठी रंगभूमीवरच्या या हसत्या खेळत्या नटाने रसिकांच्या मनाला चटका लावून दि. ९ ऑगस्ट २०२२ ला पहाटे मुंबईमध्ये झावबावाडी, चर्नी रोड येथील राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. आणखी काही वर्षे निर्विवादपणे प्रदिप पटवर्धन रंगभूमीवर आणि चित्रपट सृष्टीत दिसणार असं वाटतं असतानाच रसिकांच्या मनात हूरहूर लावून प्रदिप पटवर्धन अंतिम यात्रेला निघाले. त्यांच्या भूमिका मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टीत कायमच आठवणीत राहतील.

**

# बालांगण

## निसर्गातले रंग येतात कुठून?



रंजक विज्ञान

निसर्गात आपल्याला विविध रंग दिसतात. आकाश निळे दिसते. झाडे हिरवी असतात. रंगीबेरंगी फुले आणि वेगवेगळ्या रंगांची फळे पाहून मन प्रसन्न होते. हे रंग आपोआप तयार होत नाहीत. त्यामागे विज्ञान आहे. सूर्यप्रकाशातील रंग सूर्यामुळे तयार होतात. सूर्याच्या आत प्रचंड उष्णता आणि ऊर्जा असते. या उर्जेमुळे प्रकाश तयार होतो. हा प्रकाश आपल्याला पांढरा दिसतो. पण प्रत्यक्षात तो अनेक रंगांचा मिळून बनलेला असतो. सूर्यप्रकाशात लाल, नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा, जांभळा असे अनेक रंग असतात. हे रंग प्रकाशाच्या लहरींमुळे तयार होतात. प्रत्येक रंगाची लहर (फ्रिक्वेन्सी) वेगळी असते. पावसाच्या थेंबांतून सूर्यप्रकाश गेला की इंद्रधनुष्य दिसते. त्यामध्ये सूर्यप्रकाशातील सगळे रंग स्पष्टपणे दिसतात. सूर्यप्रकाश कोणत्याही वस्तूवर पडतो तेव्हा त्या वस्तूमधील घटक काही रंग शोषून घेतात आणि काही रंग परावर्तित करतात. परावर्तित झालेले रंग आपल्या डोळ्यांना दिसतात. त्यामुळे प्रत्येक वस्तूचा रंग वेगळा दिसतो. झाडांची पाने हिरवी दिसतात. कारण पानांमध्ये असलेले एक विशेष द्रव्य सूर्यप्रकाशातील लाल आणि निळे रंग शोषून घेते आणि हिरवा रंग परत पाठवते. फुलांमध्ये वेगवेगळी रंगद्रव्ये असतात. त्यामुळे काही फुले लाल, काही पिवळी, काही निळी तर काही पांढरी दिसतात. कच्च्या फळांमध्ये हिरवा रंग जास्त दिसतो. कारण त्यात हिरव्या रंगाचे द्रव्य जास्त प्रमाणात असते.

उदाहरणार्थ, कच्च्ची केळी, कैरी किंवा कच्चे सफरचंद हिरवे दिसतात. फळ पिकू लागले की हिरव्या रंग परावर्तित करणारे द्रव्य कमी होते आणि इतर रंगद्रव्ये तयार होतात. त्यामुळे रंग बदलतो. केळ पिवळे होते. आंबा पिवळा किंवा केशरी दिसतो. सफरचंद लाल होते. आकाश निळे दिसण्याचे कारण थोडे वेगळे आहे. सूर्यप्रकाश आकाशातून प्रवास करताना हवेमधील अगदी सूक्ष्म कणांवर आदळतो. या कणांमुळे निळा रंग जास्त पसरतो. त्यामुळे दिवसा आपल्याला आकाश निळे दिसते.

## प्राण्यांचे शत्रू

पेट केअर

छोट्या दोस्तांनो, तुमच्याकडे पाळीव प्राणी आहे का? पाळलेल्या प्राण्यावर तुमचं खूप प्रेम असतं. त्याच्याशिवाय अजिबात करमत नाही. प्राण्यांची खूप काळजी घेतली जाते. त्यांच्या खाण्या-पिण्याकडे लक्ष दिलं जातं. सध्या डॉग आणि कॅटफूडचा जमाना आहे. अनेकदा आपण आपल्याला आवडणारे पदार्थ त्यांना खायला देतो. पण काही पदार्थांमुळे त्यांना त्रास होऊ शकतो. प्राण्यांना कोणते पदार्थ चालत नाहीत? जाणून घेऊ या...

✻ कॅफेनयुक्त पेयं प्राण्यांना देऊ नका. चहा, कॉफी, कोल्ड ड्रिंक तसंच काही हेल्थ ड्रिंक्समध्ये कॅफेन असू शकतं.
कॅफेनमुळे प्राण्यांचे स्नायू दुखतात. प्राणी अस्वस्थ होतात. रक्तस्राव होऊ शकतो.

✻ प्राण्यांना चॉकलेट देऊ नका. चॉकलेटमुळे प्राण्यांचा मृत्यू होऊ शकतो. चॉकलेटमध्ये कॅफेन आणि थेब्रोमाइन हे घटक असतात. यामुळे प्राण्यांना कोणताही त्रास होऊ शकतो.

✻ पाळीव प्राण्यांना कांदा-लसूण देऊ नका. त्यांच्या अन्नात हे पदार्थ असू नयेत. कांदा-लसणामुळे प्राण्यांच्या शरीरातल्या लाल रक्तपेशी कमी होतात. यामुळे त्यांना ॲनिमिया होऊ शकतो.

✻ द्राक्ष, मनुका, बेदाणे खाल्ल्याने पाळीव प्राणी आजारी पडू शकतात. त्यांना उलट्या, जुलाबाचा त्रास होतो. हे पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ल्याने त्यांची मूत्रपिंड निकामी होऊ शकतात.




✻ प्रौढ कुत्री आणि मांजरं दूध तसंच दुग्धजन्य पदार्थ पचवू शकत नाहीत. या पदार्थांमुळे त्यांना उलट्या, जुलाब होऊ शकतात. तसंच यामुळे त्यांना विविध प्रकारची ॲलर्जी होऊ शकते.

✻ प्राण्यांना कच्चं पीठ खायला देऊ नका. यामुळे त्यांचं पोट बिघडू शकतं. शिवाय त्यांना अस्वस्थ वाटतं. त्यांना श्वास घ्यायला त्रास होऊ शकतो.

✻ प्राण्यांना कच्ची अंडी आणि मासे देऊ नका. यामुळे त्यांना आरोग्यविषयक समस्या भेडसावू शकतात.

## अनुभवा संगीतातली जादू



कोण होणार?

सध्याचं जग प्रचंड धावपळीचं झालं आहे. ताणतणाव खूप वाढले आहेत. या सगळ्याचा मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर दुष्परिणाम होत असतो. नैराश्य, मानसिक आजार, ताणतणाव यावर विविध मार्गांनी उपचार केले जातात. त्यापैकी एक पद्धत म्हणजे म्युझिक थेरपी. संगीतात निराळी जादू असते. आवडीचं संगीत तुमचा मूड चांगला करतं. शरीरात चांगल्या हार्मोन्सची निर्मिती होते. तुम्हाला संगीताची आवड असेल तर म्युझिक थेरपिस्ट म्हणून काम करता येईल. रूग्णाची समस्या, मानसिक अवस्था, स्वभाव याचा विचार करून संगीताची निर्मिती करावी लागते. रूग्णाच्या तब्बेतीत होणाऱ्या सुधारणेनुसार संगीताच्या रचनेत बदल केला जातो. रूग्णाचं नैराश्य दूर करण्यासाठी संगीताचा प्रभावी वापर करणं म्हणजे म्युझिक थेरपी. म्युझिक थेरपीशी संबंधित अभ्यासक्रमांना बारावीनंतर प्रवेश घेता येतो. ॲडव्हान्स लेव्हल म्युझिक थेरपी, सर्टिफिकेट इन म्युझिक थेरपी, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन क्लिनिकल म्युझिक थेरपी, प्रोफेशनल पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन म्युझिक थेरेपी हे अभ्यासक्रम पूर्ण करून या क्षेत्रात करीअर करता येईल. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी संगीताची आवड, कल्पकता, संवेदनशीलता, आत्मविश्वास, दृढ निश्चय, इतरांना समजून घेणं, धैर्य, मेहनतीची तयारी असे गुण गरजेचे आहेत.



## जीवनावश्यक मीठ

खनिजांची माहिती

मीठ हे मानवाच्या जीवनासाठी अत्यंत आवश्यक असे खनिज आहे. मिठाला दैनंदिन जीवनात खूप महत्त्व आहे. अन्नाशिवाय मनुष्य जगू शकत नाही आणि मिठाशिवाय अन्नाला चव येत नाही. त्यामुळे मीठ ही एक जीवनावश्यक वस्तु मानली जाते. मीठ मुख्यतः समुद्राच्या पाण्यातून मिळते. समुद्राचे पाणी उथळ भागात साठवून सूर्यप्रकाशात वाळवले जाते. पाणी वाफ बनून उडून जाते आणि खाली मीठ उरते. या पद्धतीला खारपाण्याचे बाष्पीभवन असे म्हणतात. परंतु काही ठिकाणी जमिनीत खोलवर साठलेले खडकमीठही आढळते. हे खडकमीठ खाणींमधून काढले जाते. भारतात गुजरात, राजस्थान, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश येथे खडकमीठ मोठ्या प्रमाणात तयार केले जाते.

खनिज मीठ म्हणजे जमिनीत खोलवर साठलेले नैसर्गिक खडकमीठ होय. हे मीठ लाखो वर्षांपूर्वी आटलेल्या समुद्रांच्या पाण्यापासून तयार झालेले असते. काळानुसार माती, खडक आणि दगडांच्या थराखाली हे मीठ दबले गेले आणि त्याचे घन खडक तयार झाले. म्हणूनच याला खडकमीठ असेही म्हणतात. खनिज मीठ नैसर्गिक स्वरूपात मिळते. त्यावर फारशी प्रक्रिया केलेली नसते. त्यामुळे यामध्ये नैसर्गिक खनिज घटक आढळतात. हे मीठ ओलसरपणा पटकन शोषून घेत नाही. त्याची चव सौम्य असते आणि ते हळूहळू विरघळते. खनिज मीठ काढण्यासाठी खाणी खोदल्या जातात. प्रथम जमिनीखालील मिठाचे थर शोधले जातात. त्यानंतर बोगदे तयार करून मोठ्या मिठाच्या दगडांचे तुकडे फोडले जातात. हे तुकडे वर आणून त्यांचे छोटे तुकडे केले जातात. काही ठिकाणी मिठाचे दगड पाण्यात विरघळवून ते पाणी वर आणले जाते आणि पुन्हा वाळवून शुद्ध मीठ मिळवले जाते. या पद्धतीमुळे मीठ स्वच्छ आणि वापरण्यायोग्य बनते. सैंधव मीठ हा खनिज मिठाचाच एक प्रकार आहे. याचा रंग फिकट गुलाबी किंवा गुलाबी असतो. हा रंग त्यामध्ये असलेल्या लोखंडाच्या नैसर्गिक अंशामुळे येतो. त्यात औषधी गुणधर्म असल्यामुळे सैंधव मिठाला आयुर्वेदात विशेष महत्त्व आहे. हे पचनास हलके आणि शरीरासाठी उपयुक्त असल्याचे मानले जाते.

## अरवली पर्वतरांगा



ओळख पर्वतांची

अरवली पर्वतरांग ही भारतातील अतिशय प्राचीन पर्वतरांग मानली जाते. ही पर्वतरांग राजस्थानपासून सुरू होऊन हरियाणा आणि दिल्लीपर्यंत पसरलेली आहे. ही पर्वतरांग फार उंच नाही. परंतु तिचे ऐतिहासिक, भौगोलिक आणि पर्यावरणीय महत्त्व खूप मोठे आहे. अरवली पर्वतरांग उत्तर भारतातील वाळवंट आणि हिरव्या प्रदेशामध्ये नैसर्गिक भिंत म्हणून काम करते. त्यामुळे राजस्थानातील वाळवंटाचा विस्तार थांबवण्यात अरवली पर्वतरांगेची मोठी भूमिका आहे.
अरवली पर्वतरांगेतील गुरु शिखर हे सर्वात उंच शिखर (१७०० मीटर) आहे. हे शिखर राजस्थानमधील माउंट आबू परिसरात आहे. माउंट आबू हे या पर्वतरांगेतील एक प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण आहे. या पर्वतरांगेत भील, मीणा, गरासिया यांसारख्या आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात राहतात. या जमाती निसर्गाशी जवळीक ठेवून आपले जीवन जगतात. शेती, जंगलातून मिळणारी फळे, मध, औषधी वनस्पती यांवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. त्यांच्या परंपरा, लोककला आणि सण उत्सव अरवलीच्या संस्कृतीला वेगळे स्थान देतात. राजस्थान व गुजरातमधून वाहत जाऊन अरबी समुद्राला मिळणारी साबरमती, माउंट आबू परिसरातून उगम पावणारी आणि पुढे चंबळ नदीत मिसळून जाणारी बनास नदी, पुष्कर परिसरातून उगम पावणारी लुणी नदी या नद्या राजस्थानमधील महत्त्वाच्या नद्या आहेत. लुणी नदी पुढे वाळवंटातच लुप्त होते. माही, साखी, रूपनगढ यासारख्या अनेक लहान नद्या अरवली पर्वतरांगांच्या परिसरात उगम पावतात. अरवली पर्वतरांगेत अनेक प्रसिद्ध जंगले आहेत. सरिस्का आणि रणथंभोरसारखी जंगले याच पर्वतरांगेच्या परिसरात येतात. या जंगलांमध्ये वाघ, बिबट्या, हरिण, सांबर, नीलगाय, कोल्हा, रानडुक्कर असे विविध प्राणी आढळतात. तसेच मोर, घुबड, गरुड, पोपट, तितर यांसारखे अनेक पक्षी येथे आढळतात.

आज औद्योगिकीकरण आणि खाणकामामुळे अरवली पर्वतरांगेचे नुकसान होत आहे. तरीही भारताचा नैसर्गिक वारसा जपणारीही एक मौल्यवान पर्वतरांग आहे.त्यामुळे तिचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

## पोट बिघडलं तर...



हेल्थ वेल्थ

छोट्या दोस्तांनो, आता तुम्ही चकली, चिवडा, लाडू, शंकरपाळी अशा पदार्थांवर ताव मारणार असाल ना? या दिवसात हे जिन्नस असतात त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारच्या मिठायाही असतात. पण दिवाळीत म्हणा वा एरवी म्हणा, असे पदार्थ प्रमाणात खाणं योग्य ठरतं. ते जास्त प्रमाणात खाल्ले तर पोट बिघडू शकतं. अपचनाची समस्या निर्माण होऊ शकते. ही समस्या कधीही उद्भवू शकते. हॉटेलमधलं अन्न खाल्ल्यावर किंवा घरी बनवलेला आवडता पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ला तरी पोट बिघडू शकतं. अशा वेळी काय काळजी घ्यायला हवी, याविषयी...

**कधी होतं अपचन?**

अपचन फक्त मोठ्यांनाच होतं असं नाही तर तुमच्यासारख्या लहान मुलांनाही अपचन होऊ शकतं. सोप्या शब्दात सांगायचं तर अपचन म्हणजे पोट बिघडणं. भरपूर किंवा बकाबका खाल्ल्याने किंवा एखादा पदार्थ न पचल्याने पोट बिघडू शकतं. पोट बिघडल्याने छातीत जळजळ होते. खूप अस्वस्थ वाटतं. पोटातल्या आम्लामुळे असं होतं. अपुरी झोप, ताणतणाव यामुळेही पोट बिघडू शकतं. पोट बिघडल्यानंतर घ्यायच्या औषधांच्या जाहिराती तुम्ही टिव्हीवर बघत असाल. पण आई-बाबांना विचारल्याशिवाय कोणतंही औषध घेऊ नका.

**लक्षणं आणि उपाय**

पोटाच्या वरच्या भागात होणारी जळजळ किंवा वेदना, मळमळणं, पोट जड झाल्यासारखं वाटणं, पोटातून आवाज येणं ही पोटाच्या त्रासाची लक्षणं मानता येतात. अपचनाची समस्या वारंवार होत नाही. अतिखाणं झालं तर ही समस्या निर्माण होऊ शकते. अनेकदा पोषक पदार्थ खाल्ल्यानंतरही पोट बिघडू शकतं. अशा वेळी डॉक्टरांकडे जाणं गरजेचं असतं. सतत उलट्या होत असतील किंवा उलटीतून रक्त पडत असेल, वजन कमी झालं असेल, भूक लागत नसेल, सारखा घाम येत असेल, पोट दुखत असेल तर तातडीने आई-बाबांना सांगा. डॉक्टरांचा सल्ला घ्या. अपचन टाळण्यासाठी तेलकट पदार्थ जास्त खाऊ नका. जास्त चॉकलेट खाऊ नका. घाईघाईने खाऊ नका. एकदा खाल्ल्यानंतर अन्न पचू द्या. एका वेळी खूप खाऊ नका. ही पथ्य अवश्य पाळा आणि तंदुरुस्त रहा.

## अजब गजब



रंजक विज्ञान

मित्रांनो, आपलं शरीर एखाद्या यंत्राप्रमाणे काम करतं हे तुम्ही जाणताच. शरीर हे एक अद्भुत मशीन आहे. देवानं विचारपूर्वक हे शरीर बनवलंय. शरीराचे विविध अवयव एकमेकांशी संलग्न असतात. ते अगदी एकजुटीनं काम करतात म्हणूनच आपण उभं राहू शकतो. या शरीराबद्दल एक गंमत माहितीये तुम्हाला? शरीरातील सर्वात मजबुत मांसपेशी जिभेत असते. जिभेवरील कोणताही घाव तात्काळ भरून येतो. आपल्या पाच बोटांपैकी मधल्या बोटाचं नख जलद गतीनं वाढतं. आहे की नाही गंमत!

✻ मध मधुर चवीसाठी प्रसिद्ध आहे. मात्र ब्राझीलमधील जंगलामध्ये आंबट मध बघायला मिळतो.

✻ फुलपाखरं कोणत्याही पदार्थांची चव आपल्या पायानं चाखतात.

✻ आपल्या शरीरातील रक्त दिवसभरात जवळपास हजार वेळा शरीरभर फिरतं.

✻ स्ट्रॉबेरीमध्ये संत्र्यापेक्षा जास्त व्हिटॅमिन्स उपलब्ध असतात.

✻ तुम्ही ओठ आणि जिभ न हलवता बोलण्याचा प्रयत्न केला तर उच्चार एकसारखाच होतो. खरं वाटत नसेल तर प्रयोग करून बघा...

## बॅटरीचं आयुष्य वाढवायचं तर...



युजफुल टिप्स

बालमित्रांनो, बॅटरी हा स्मार्टफोनचा सर्वात महत्त्वाचा भाग. स्मार्टफोनची बॅटरी लवकर डाउन होते, जास्त टिकत नाही अशा तक्रारी अनेकजण करत असतात. बॅटरीची क्षमता कमी झाली की वैताग येतो. पण काही टिप्स फॉलो करून तुम्ही बॅटरीची क्षमता टिकवून ठेऊ शकता.

✻ बॅटरी पूर्ण संपल्यानंतर फोन चार्जिंगला लाऊ नका. १० किंवा २० टक्के शिल्लक असताना चार्जिंगला लावा. यामुळे बॅटरीची क्षमता टिकून राहते.

✻ उष्णता तसंच सूर्यप्रकाशापासून फोन लांब ठेवा. उष्णतेमुळे मोबाईलच्या लिथियम बॅटरीचं बरंच नुकसान होतं.

✻ फोन कायम पूर्ण चार्ज असायला हवा, असं अनेकांना वाटत असतं. पण प्रत्येक वेळी बॅटरी पूर्ण चार्ज करण्याची गरज नसते. बॅटरी गरजेपुरती चार्ज करून फोन वापरता येऊ शकतो.

✻ बॅटरी पूर्ण चार्ज झाल्यानंतर प्लग काढून टाकावा. बॅटरी जास्त चार्ज झाली तर खराब होऊ शकते.

✻ व्हायब्रेशन मोड तसंच रिंगटोनचा आवाज मोठा असेल तर बॅटरी जास्त खर्च होते. त्यामुळे व्हायब्रेशन मोड शक्यतो बंद ठेवा आणि रिंगटोनचा आवाजही कमी ठेवा.

✻ फोनची बॅटरी संपत आली असेल तर सुरू असलेली ॲप्स तसंच वायफाय बंद करा. यामुळे फोनच्या बॅटरीचं आयुष्य वाढेल.

### स्मार्ट टिप्स

#### नियोजन करा



मुलांनो, अभ्यास आटपण्यासाठी वेळेचं नियोजन करणं गरजेचं आहे. यासाठी दिवसभरातल्या कामांची यादी करून घ्या. अभ्यासाचा प्राधान्यक्रम ठरवा. कोणत्या विषयाचा अभ्यास कधी करायचा हे आधी ठरवून घ्या. मग अभ्यासाला लागा. यामुळे तुमचं काम सोपं होईल.

### खादाडी

#### चीज कॉर्नफ्लेक्स



मित्रांनो, आवडत असल्यास तुम्ही चिज कॉर्नफ्लेक्स खाऊ शकता. यासाठी एक कप कॉर्नफ्लेक्स, अर्धा कप भाजलेले दाणे, दोन चमचे किसलेलं चीज, पाव चमचा लाल तिखट, एक चमचा बटर आणि चवीनुसार मीठ असं साहित्य घ्या. सर्वात आधी मायक्रोवेव्ह १८० अंश सेल्सियसला प्रीहिट करून घ्या. गरज असल्यास यासाठी मोठ्यांची मदत घ्या. आता एका काचेच्या बाऊलमध्ये कॉर्नफ्लेक्स, बटर, दाणे, चीज, तिखट आणि मीठ असं साहित्य घाला. नीट हलवून घ्या. यानंतर बाऊल मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. दोन मिनिटं गरम करा. गरमागरम चीज कॉर्नफ्लेक्स खा.

### दोस्त हे मस्त

#### जग पेंग्विनचं



मुलांनो, पेंग्विन हा एक पक्षी आहे. पण त्याला उडता येत नाही. हे पक्षी मासे खातात. ते दक्षिण गोलार्धात, थंड वातावरणात रहातात. न्यूझीलंडमध्येही पेंग्विन आढळतात. त्यांचे डोळे पिवळ्या रंगाचे असतात. लिटिल ब्लू पेंग्विन ही पेंग्विनची सर्वात लहान प्रजाती आहे. या पेंग्विनची उंची फक्त १६ इंच असते तर एम्परर पेंग्विनची उंची जवळपास तीन फूट असते. पेंग्विन बर्फावर तुरूतुरू चालतात.

### वाचा तर खरं

#### शासाठी... पोटासाठी...



दोस्तांनो, पोटाचं आरोग्य उत्तम असायला हवं. म्हणूनच पोटासाठी काही योगासनं आहेत जी नियमितपणे करायला हवी. त्यापैकी एक आसन म्हणजे पादोगुष्ठनासा स्पर्शासन. या आसनामुळे पाठ आणि मानेचे स्नायू बळकट होतात. पचनक्रिया सुधारते. पोटाच्या बारिकसारीक तक्रारी दूर होतात. त्यामुळे या आसनाची माहिती घ्या आणि नियमितपणे करा.

(छायाचित्र : समीर मालोदे)









# महाराष्ट्रातील नं १ हळदीकुंकू

## सहप्रायोजक













## खरेदीची लूट













## खास भेट























# कलाकारांच्या उपस्थितीत अन् खेळातून रंगला कृषीवल हळदीकुंकू सोहळा









कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)